


मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

१९९९ पासून

सातारा, रविवार, १ जानेवारी २०२३ । • पाने : ८ । मूल्य : रू. ४.०० । सातारा येथून प्रकाशित RNI Reg. no: MAHMAR/17902/1999 www.rajdand.com /rajdandlive

## नारायण राणे-राज ठाकरे भेटीने नवे संकेत



**मुंबई :** भारतीय जनता पार्टीचे नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी आज वर्षाच्या शेवटच्या दिवशी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. अचानक झालेल्या या भेटीत काय चर्चा झाली हे समोर येऊ शकलेले नाही. मात्र या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राज ठाकरे यांच्या दादरमधील शिवतीर्थ या निवासस्थानी ही भेट झाली. या भेटीचे मुख्य तपशील समोर आलेले नाहीत. मात्र वैयक्तिक तसेच कौटुंबीक स्तरावर ही भेट घेतल्याचे सांगण्यात येत आहे. असे असले तरी आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुका पाहता या भेटीदरम्यान युतीबाबतही चर्चा झाल्याचे संकेत मिळत आहे.

# ‘कोरोना संदर्भात खरी माहिती जाहीर करा’
# जागतिक आरोग्य संघटनेने चीनला सुनावले

जिनिव्हा: वृत्तसंस्था

कोरोना महासाथी संदर्भात कोणताही आडपडदा न ठेवता संपूर्ण वास्तविक आकडेवारी आणि संबंधित माहिती जाहीर करावी, अशा शब्दात जागतिक आरोग्य संघटनेने चीनला सुनावले आहे.

कोरोना विषाणूची सुरुवात चीनमध्ये झाली आहे. चीनच्या शासकीय विषाणू प्रयोगशाळेत कोरोनाचा विषाणू विकसित केला गेला आणि तो प्रयोगशाळेतून अपघाताने बाहेर पडल्यानंतरच त्याचा जगभर प्रसार झाला, असा आरोप चीनवर अनेक देशांनी केला आहे. अर्थातच, चीनने तो फेटाळून लावला आहे.

तब्बल अडीच वर्ष कोरोनाच्या महासाथीने संपूर्ण जगाला वेठीस धरले होते. नुकतीच या विळख्यातून काहीशी सुटका होत असल्याचा दिलासा जगाला मिळतो न मिळतो तोच या विषाणूने पुन्हा डोके वर काढले आहे. 'शून्य कोरोना' अशी राणा भीमदेवी गर्जना करणाऱ्या चीनमध्ये कोरोनाच्या विषाणूने पुन्हा थैमान घालण्यास सुरुवात केली आहे.

चीन बरोबरच इटली, अमेरिका आणि ब्रिटन यासारख्या देशातही कोरोनाच्या विषाणूचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहेत. या साथ रोगाचा सामना करण्यासाठी सर्व देशांनी एकमेकांशी माहितीची देवाण-घेवाण करणे अत्यावश्यक आहे. मात्र कोरोना या रोगाच्या उत्पत्तीपासूनच चीन याबाबत लपंडाव खेळत आला आहे. एरवीही चीनमध्ये साम्यवादाच्या पोलादी भिंतीआड घडणाऱ्या घडामोडी बाहेरच्या जगाला क्वचितच माहिती होतात. कोरोना संदर्भात मोठ्या लोकसंख्येच्या आरोग्याचा प्रश्न असूनही चीन गुप्तता बाळगून आहे. त्यामुळे चीनला मोकळेपणाने माहिती जाहीर करण्याचे आवाहन जागतिक आरोग्य संघटनेला करावे लागले आहे.

कोरोनाच्या विषाणूने ग्रस्त असलेले रुग्ण, रुग्णालयात दाखल करण्यात आलेले रुग्ण, कोरोनाच्या विषाणूमुळे जीव गमवावे लागलेले रुग्ण आणि उपचाराधीन असलेले रुग्ण याची नियमित आकडेवारी प्रसिद्ध करावी अशी मागणी जागतिक आरोग्य संघटनेने चीनकडे केली आहे. या संदर्भात चीनचे उच्चपदस्थ वैद्यकीय अधिकारी आणि जागतिक आरोग्य संघटनेचे अधिकारी यांची उच्चस्तरीय बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत चीनला माहिती उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारतातही रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता गृहीत धरून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. भारतात लसीकरण मोठ्या प्रमाणात प्रभावीपणे करण्यात आल्याने जानेवारी महिन्यापासून कोरोनाबाधित रुग्णांच्या संख्येत उल्लेखनीय वाढ दिसून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरीही ती कोरोनाची पुढील लाट म्हणावी इतपत गंभीर नसेल, असा दिलासा तज्ज्ञांनी दिला आहे. रुग्णालयात दाखल करावे लागेल अशा रुग्णांची संख्याही तुलनेने कमी असेल, असे सांगितले जात आहे.

कोरोनाच्या पुढच्या प्रसाराबाबत काळजी करण्याचे कारण नसले तरीही काळजी घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात. नागरिकांनी लसीकरण करणे गरजेचे आहे. ज्या नागरिकांनी दोन लसी घेतल्या आहेत त्यांनीही तिसरा बूस्टर डोस घेणे गरजेचे आहे. सध्या शासकीय रुग्णालयात ही लस उपलब्ध नसली तरीही अल्पावधीत ती उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय अनावश्यक गर्दी टाळणे, मास्कचा नियमित वापर, वारंवार हात धुणे, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे,

## किल्ले रायगडावरुन येणार स्पर्धेची मुख्य क्रीडा ज्योत

**पुणे :** महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा-२०२२ चे येत्या २ ते १२ जानेवारी २०२३ जानेवारी दरम्यान शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी पुणे येथे आयोजन करण्यात आले असून स्पर्धेची मुख्य क्रीडा ज्योत किल्ले रायगड येथून ४ जानेवारी २०२३ रोजी बालेवाडीकडे प्रयाण करणार आहे.

महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा-२०२२ च्या आयोजनाबाबत राज्यात क्रीडा वातावरण निर्मिती होण्यासाठी, क्रीडा स्पर्धेची भव्यता नागरिकांना माहिती होण्यासाठी राज्यात विभागनिहाय क्रीडा ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या सर्व क्रीडा ज्योतींचे ३ जानेवारी २०२३ पर्यंत शिवछत्रपती क्रीडा संकुल , पुणे येथे आगमण होणार आहे. स्पर्धेची मुख्य क्रीडा ज्योत किल्ले रायगड येथून ४ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ९ वाजता निघणार असून ताम्हिणी घाट मार्गे सायं. ६ वाजता शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे मुक्कामी येणार आहे.

ऑलिम्पिक हॉकीपटू अजित लाकरा, राष्ट्रीय पातळीवरील मैदानी स्पर्धा खेळाडू समिक्षा खरे, राष्ट्रीय पदक विजते हॉकीपटू अक्षदा ढेकळे, प्रज्ञा भोसले, राहुल शिंदे, आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक खेळाडू श्रद्धा तळेकर सोहम ढोले, राष्ट्रीय पातळीवरील मैदानी स्पर्धा खेळाडू गायत्री चौधरी, आंतरराष्ट्रीय वुशु खेळाडू श्रावणी कटके आणि स्वराज कोकाटे हे खेळाडू किल्ले रायगड ते पुणे दरम्यान क्रीडज्योत धावक असतील.

नागपूर, अमरावती, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर, **(पान २ वर)**

# कोरोनाच्या नावाखाली सुरू झाली शेतकऱ्यांची पिळवणूक
## दलालांचा आपल्या तुंबड्या भरून घेण्याचा प्रयत्न

**पुणे : प्रतिनिधी**

शेतमालाच्या विक्री व्यवहारात कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना लुबाडून आपल्या तुंबड्या भरून घेण्याचा प्रयत्न बहुतेक दलालांकडून नेहेमीच होत असतो. आता तर कोरोना महासाथी नवी लाट येणार असल्याची भीती घालून दलालांनी शेतकऱ्यांकडे पडेल भावात शेतमालाची मागणी करत आपल्या पोळीवर तूप ओढून घेण्याचा प्रयत्न चालविला असल्याचे प्रकार उघडकीला येत आहेत.

तब्बल अडीच वर्ष संपूर्ण जगाला वेठीस धरणाऱ्या कोरोना महासाथीच्या विळख्यातून जरा कुठे बाहेर पडत असल्याचा दिलासा मिळत असतानाच या विषाणूने चीनमध्ये पुन्हा चीनमध्ये थैमान घालण्यास सुरुवात केली आहे. ब्रिटन, अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांतही कोरोनाबाधितांची संख्या वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने भारतात कोरोना साथीची परिस्थिती आटोक्यात ठेवण्यासाठी सावध पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. मात्र, या संभाव्य संकटाची भीती घालून शेतकऱ्यांची लुबाडणूक करण्यास दलालांनी सुरुवात केली

समाजमाध्यमात पोस्ट करून सांगली जिल्ह्यातील एका तरुणाने या प्रकारांना वाचा फोडली आहे. त्याची ही पोस्ट प्रातिनिधिक स्वरूपाची असून अशाच प्रकारे अनेक शेतकऱ्यांची लुबाडणूक केली जात असणार हे उघड आहे. या तरुणाचे वडील सांगली जिल्ह्यातील तडवळे या गावाचे फलोत्पादक शेतकरी आहेत. त्यांच्या बागेमध्ये विविध फळांची ११० कलमे आहेत. त्यामधून सरासरी दीड टन फळांचे उत्पादन होते. सध्याच्या काळाची गरज ओळखून त्यांनी आपल्या बागेत कोणत्याही रासायनिक खतांचा अथवा औषधांचा वापर केलेला नाही. पूर्णपणे सेंद्रिय पद्धतीने त्यांनी आपली बाग जोपासली आहे.

आगामी काळात कोरोना महासाथीची पुढची लाट येणार असून त्यामुळे व्यवहार पुन्हा ठप्प होणार आहेत, अशी भीती दाखवून दलाल मातीमोल भावाने फळांची मागणी करत आहेत, असे या तरुणाने नमूद केले आहे. त्याने आपल्या फळांची ऑनलाईन विक्री करता येईल का, याची चाचपणी करण्यासाठी असे व्यवहार करणाऱ्या काही प्रसिद्ध वेबसाईटसना ईमेल पाठविले. मात्र, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आला नाही. जर आपली

फळे ऑनलाईन विकता आली नाहीत तर सलग तिसऱ्या वर्षी ती घाटा सहन करून विकण्याची पाळी येणार आहे, असेही या तरुणाने आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

हा ११० कलमांचा दीड टन उत्पादन घेणारा बागायतदार म्हणजे ऑनलाईन विक्री करणाऱ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या दृष्टीने दुर्लक्ष करण्याच्या पात्रतेचा आहे. मात्र, रस्त्याच्या कडेला बसून आपल्या फळांची आपणच किरकोळ विक्री करण्याइतका तो छोटाही नाही. फळे नाशिवंत असल्याने किरकोळीत दीड टन फळे विकली जाईपर्यंत त्याची नासाडी होण्याची शक्यताच अधिक आहे.

या तरुणाची पोस्ट प्रसिद्ध झाल्यावर त्यावर अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांची हतबलता व्यक्त करणाऱ्या पोस्ट्स अधिक असल्या तरी काही दिलासा देणाऱ्या, मार्ग सुचविणाऱ्याही आहेत. एका शेतकऱ्याने आपल्या मालाची रास्त भावात विक्री करण्यासाठी सुरू केलेल्या https://mobile.Twitter.com/HarvestingFN या ट्विटरवरील नेटवर्कची लिंकही दिली आहे. मात्र अनेक जणांनी दलाल मंडळींना दोषी ठरविणारी आणि कोल्ड स्टोअरेजची आवश्यकता व्यक्त करणारी प्रतिक्रिया दिली आहे.






# गतिमान कारभारासाठी एक एप्रिलपासून 'ई ऑफिस' प्रणाली

**मुंबई :** प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि कागदविरहीत (पेपरलेस) होण्यासाठी येत्या १ एप्रिलपासून राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणाली सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. कारभाराला गती देण्यासाठी केंद्राच्या धर्तीवर राज्यातही शासकीय कामकाजाच्या फाईल्स निर्णयासाठी चार स्तरापर्यंतच पाठविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल. तसेच, कामकाज संपूर्णपणे कागदविरहीत (पेपरलेस) होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. सर्व शासकीय कार्यालये 'ई-ऑफिस' वापरू लागले की मोबाईलवर देखील कामकाजाच्या फाईल्स, कागदपत्रे पाहणे शक्य होणार आहे. त्याला मान्यता देण्याची राज्य शासनाची भूमिका आहे.

**फाईल्सचा प्रवास होणार कमी**

सध्या मुख्यमंत्र्यांकडे निर्णयासाठी येणारी फाईल ८ विविध स्तरांमधून येते. या अधिकच्या स्तरांमुळे संबंधित विषयांचवर निर्णय होण्यास विलंब लागतो. हा कालापव्यय टाळून गतिमान कारभारासाठी फाईल्स सादर करण्याचे स्तर कमी करण्याच्या सूचना देतानाच फक्त चार स्तरांवरुनच फाईल मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत.



ऑनलाईन सेवांची संख्या वाढणार

ई-सेवा निर्देशांकात देखील महाराष्ट्राला प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी ऑनलाईन सेवांची संख्या जास्तीत-जास्त वाढविण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. सध्या राज्यात ४५० सेवा ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

**तक्रारींवरील कार्यवाहीला वेग देणार**

सार्वजनिक तक्रारींच्या निवारणासाठी ऑनलाईन यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. या तक्रारींचे डिजिटल ट्रॅकिंग करण्यात येईल.ह तक्रारींवर विभागांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यासाठी एक स्वतंत्र डॅशबोर्ड तयार करण्यात येणार आहे. या सार्वजनिक तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीचा सातत्याने आढावा घेण्यात येणार आहे.

**जिल्ह्यांचेही होणार 'गुड गव्हर्नन्स रँकिंग'**

सध्या महाराष्ट्रात फक्त राज्यस्तरावर सुशासन पद्धतीचे पर्यवेक्षण होते, आता शासनाच्या प्रत्येक विभागांची आणि जिल्ह्यांची गुड गव्हर्नन्स रँकिंग केली जाणार आहे. शासकीय विभाग आणि जिल्ह्यांच्या प्रशासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शासकीय सेवांची, सुशासनाची क्रमवारी निश्चित करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. या सुशासनाच्या क्रमवारीमुळे विभागांमध्ये आणि जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये स्पर्धा निर्माण होईलच, शिवाय जनतेला मिळणाऱ्या सेवांचा दर्जा वाढेल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# पुणे नाशिक दरम्यान द्रुतगती महामार्ग उभारणार

**पुणे :** नाशिकमधील वाढती औद्योगिक प्रगती लक्षात घेऊन पुणे आणि नाशिक या दोन शहरांमधील वाहतूक सुलभ आणि वेगवान करण्यासाठी द्रुतगती ममहामार्ग उभारला जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

नाशिक परिसरात वेगाने औद्योगिकरण होत असल्याने माल वाहतूक आणि प्रवासी वाहतूक यांच्या प्रमाणातही वेगाने वाढ होत आहे. ही वाढती गरज लक्षात घेऊन राज्याच्या आर्थिक विकासात, रोजगार निर्मितीत या महामार्गाचा वाटा महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

सध्या पुणे आणि मुंबई ही शहरे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गाने जोडली आहेत तर मुंबई नाशिकमध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे द्रुतगती महामार्ग विकसित करण्यात आला आहे. आता मुंबई प, पुणे, नाशिक हा सुवर्ण त्रिकोण जोडण्यासाठी नवा महामार्ग उभारण्यात येणार आहे.

या संकल्पित महामार्गाचा व्यवहार्यता अहवाल, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि जमीन अधिग्रहण ही कामे १२ महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहेत आणि प्रत्यक्ष काम वेगाने पूर्ण करण्यात येईल, असेही या अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रस्तावित महामार्ग पुण्यापासून सुरू होणार असून तो शिंदे गावाजवळ राष्ट्रीय महामार्गाला जोडला जाईल. पुण्यातील खेड, जुन्नर आंबेगाव, अहमदनगरमधील संगमनेर आणि नाशिकमधील सिन्नर तालुक्यातून हा १८५ किलोमीटर लांबीचा महामार्ग जाणार आहे. महामार्ग दोन्ही बाजूंनी ५- ५ पदरी असणार आहे. महामार्गावर आवश्यक त्या सर्व ठिकाणी बाहेर पडण्यासाठी उड्डाणपूल, तर वाटेतील गावांमधली वाहतूक टाळण्यासाठी भुयारी मार्ग असणार आहेत. महामार्गावर प्रत्येक ५ किलोमीटर अंतरावर फूड मॉल्स, उपचार केंद्र आणि दूरध्वनी सुविधा उपलब्ध असेल. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना आयटी पार्क आणि शैक्षणिक संकुल असणार आहेत.महामार्गावरून प्रवास करताना मोफत वाय फाय सुविधाही मिळणार आहे.

# भंगारातून आकाराला आली इलेक्ट्रिक बाईक

**गुवाहाटी :** नागालँड म्हटलं की अशांतता, फुटीरतावादी चळवळी किंवा अर्धनग्न आदिवासी हेच चित्र बहुतेकांच्या नजरेसमोर येते. मात्र, यंत्र दुरुस्त करणाऱ्या एका कारागिराने एका पोलीस वाहन चालकाच्या साहाय्याने चक्क भंगारातून बॅटरीवर चालणारी दुचाकी आकाराला आणली आहे.



तुमांग असे या कारागिराचे नाव असून पोलीस चालक पी खुमिंग यांनी त्याला या प्रकल्पात मोलाची मदत केली आहे. या दोघांनी मिळून विकसित केलेल्या इलेक्ट्रिक बाईकसाठी बॅटरी, क्सेलरेटर आणि काही किरकोळ सुटे भाग वगळता पूर्णपणे भंगार वापरण्यात आले आहे.

ही बाईक ४ फूट ६ इंच लांब, ३ फूट ६ इंच उंच या आकाराची आहे. ही गाडी ताशी २५ किलोमीटर वेगाने धावू शकते. या वाहनाची १२० किलो वजन वाहून नेण्याची क्षमता आहे. या वाहनाचा ब्रँड विकसित करण्यात येणार असून त्याला 'व्हील्स ऑफ नागाज' असे नाव देण्यात आले आहे.

राज्याचा नोकलाक जिल्हा हा म्यानमारच्या सीमेला लागून असलेला दुर्गम भाग. दळणवळाच्या साधनांचा अभाव. बाईक विकत घेण्यासाठी राज्यातील मुख्य बाजारपेठ असलेल्या दिमापूर किंवा राजधानी कोहिमा इथेपर्यंत तब्बल १५ ते १६ तासांचा प्रवास करून जावे लागते. नागरिकांची ही अडचण जिल्ह्याच्या संवेदनशील पोलीस अधीक्षक प्रीतपाल कौर यांच्या लक्षात आली. स्थानिक नागरिकांना त्यांनीच बनवलेली बाईक का उपलब्ध होऊ नये, असा विचार कौर यांच्या मनात आला. त्यासाठी त्यांनी कारागीर तुमांग याला पाचारण केले.

अन्न शिजवण्याची, पदार्थ वाळवण्याची यंत्र, शेतातील टाकाऊ माल जाळण्याची धूरविरहित चूल अशी गृहोपयोगी आणि किफायतशीर यंत्रसामग्री बनविल्यामुळे तुमांगच्या नावाची जिल्ह्यात चर्चा होती. कौर यांनी त्याला इलेक्ट्रिक बाईक तयार करण्याबाबत विचारणा केली असता त्याने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. त्याने या कामासाठी काही साधनसामुग्री आणि एक मदतनीस लागेल, असे सांगितले. कौर यांनी त्याला वेल्डिंग मशिनसह इतर साधने उपलब्ध करून दिली आणि आपल्या पोलीस वाहनावरील चालक खुमींग यांना त्याच्या मदतीसाठी रवाना केले.

या दोघांच्या प्रयत्नातून टाकाऊ भंगारातून इलेक्ट्रिक बाईक आकाराला आली. पुढच्या काळात हे दोघे कारागीर आपल्या गाडीत आणखी सुधारणा करून नवनवी मॉडेल्स विकसित करतील, असा विश्वास कौर यांनी व्यक्त केला आहे. हा कल्पक उपक्रम अधिक व्यापक करून कुशलतेने बंदुका बनविणाऱ्या नागा तरुणांना उपयुक्त यंत्रसामुग्री बनविण्यास प्रोत्साहन देण्यात येईल, असे कौर यांनी नमूद केले. त्याला 'इनोव्हेटिव्ह नोकलाक' असे नाव देण्यात आले आहे. नॉट गन बट मशीन या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जाणार आहे.

# राजाराम बापू बँकेचे उपाध्यक्ष जनार्दन पाटील काका यांचे निधन

**इस्लामपूर :** सांगली जिल्ह्यातील जेष्ठ नेते,वाळवा पंचायत समितीचे माजी सभापती, राजाराम बापू सहकारी बँकेचे उपाध्यक्ष जनार्दन यशवंत पाटील (काका) यांचे सोमवारी दुपारी बेळगाव येथे निधन झाले. येथील खासगी हॉस्पिटलमध्ये गेल्या आठ दिवसापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. ते ८३ वर्षांचे होते.

त्यांचे पार्थिव मंगळवारी सकाळी ९ वा. कासेगाव (ता. वाळवा) येथील त्यांच्या गावातील वाड्यासमोर अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. कृष्णा नदी घाटावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. ते लोकनेते राजारामबापू पाटील यांचे पुतणे, माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांचे चुलत भाऊ, तर सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, युवा नेते देवराज पाटील, जिल्हा परिषद सदस्या संगीता पाटील यांचे वडील होत.

जनार्दनकाका पाटील यांनी तरुण वयातच सार्वजनिक जीवनास सुरुवात करून त्यांचे वडील माजी सरपंच, राजारामबापू सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक स्व.यशवंतअण्णा पाटील यांचा राजकीय वारसा समर्थपणे पुढे नेला आहे. प्रथम ते स्व.बापूंच्याबरोबर संपूर्ण राज्यात सावली सारखे वावरले आहेत. त्यांनी कासेगावचे सरपंच, जिल्हा परिषदेचे सदस्य, राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक आणि वाळवा पंचायत समितीचे सभापती पद भूषविले आहे. त्यांच्या साडे सात वर्षाच्या सभापती पदाच्या कारकिर्दीत वाळवा पंचायत समितीने सातत्याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. ते सध्या राजारामबापू सहकारी बँकेचे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी पहात होते. त्यांच्या पश्चात विवाहित मुलगा, चार मुली, सून, नातू, चुलत भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. रक्षा विसर्जन बुधवार दि.२८ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ९.३० कासेगाव (ता.वाळवा) येथे केले जाणार आहे.

### पुण्यातील 'द इको फॅक्टरी फाऊंडेशन' स्वयंसेवी संस्थेतर्फे

# शाश्वत जीवनशैलीच्या प्रसारासाठी ७५,०००+ भारतीय वंशाच्या जातींच्या रोपांचे दान

### भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या ७५ व्या वर्धापनदिनाच्या निमित्त सुरू केलेला

**पुणे :** पुणे स्थित द इको फॅक्टरी फाऊंडेशन (टीईएफएफ) या विना-नफा स्वयंसेवी संस्थेची स्थापना आनंद चोरडिया यांनी वर्ष २०१६ मध्ये केली. ही संस्था ग्रामीण, शहरी व औद्योगिक क्षेत्रात शाश्वतता प्राप्त करण्यासाठी अथक कार्यरत आहे. भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ७५वा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी आनंद चोरडिया यांनी ७५,०००+ भारतीय वंशाच्या जातींची रोपे / झाडे दान करण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार टीईएफएफ संस्थेने गेल्या वर्षापासून भारतीय देशी झाडांच्या ३७ जातींची ७५,००० रोपे आदिवासी महिलांकडून बनवून घेऊन, वाढवून ती कंपन्या, शाळा/महाविद्यालये आणि जबाबदार नागरिकांच्या गटाला दान केली आहेत. ह्या उपक्रमामुळे आदिवासी महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे. जैववैविध्य जतन करणे व पडीक जमीन सुपीक करणे या उद्देशाने गेल्या १५ ऑगस्टला सुरू झालेला हा उपक्रम नुकताच पूर्ण झाला.

यासंदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना आनंद चोरडिया म्हणाले, आपल्या राष्ट्राचे आरोग्य मातीच्या आरोग्यात सामावलेले आहे आणि जोडीलाच कचऱ्यातून संपत्ती व कचऱ्यातून आरोग्य या संकल्पनेवर माझा दृढ विश्वास आहे. त्यामुळे आपण या दिशेने प्रयत्न केले आणि प्रत्येकाला शाश्वत जगण्यासाठी सक्षम बनवले तर देशाला स्वच्छ, हरित, आरोग्यपूर्ण आणि संपन्न बनवू शकतो. भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आम्ही आमचा वाटा उचलला ही भावना खूप सुखद आहे. मी आनंदी आणि समाधानी असून यापुढेही खूप काही काम करण्याची अपेक्षा बाळगून आहे. या उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना श्री. चोरडिया म्हणाले, की विविध प्रकल्प संघटितरीत्या राबवण्यासाठी आम्ही आमची कार्यपद्धती चार 'एस'मध्ये



विभागली आहे. हे चार 'एस' म्हणजे सेवा, सेतू, सत्त्व आणि संवर्धन. यातून शाश्वत जीवनशैली आणि प्रथा अंगिकारण्याचा आमचा हेतू आहे. फाऊंडेशनने विविध ठिकाणे, संस्था व खासगी शेतांमध्ये रोपांचे वितरण हाती घेतल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक व्यक्तीत आरोग्यपूर्ण जीवनशैली रुजवण्यासाठी प्रत्येकाला शाश्वत जीवन सक्षमीकरणाचा प्रवर्तक बनवणे आणि समाज, पृथ्वी व संपन्नता यासाठीच्या पारंपरिक पण अभिनव पद्धतींची जोपासना करणे, हे श्री. चोरडिया यांचे उद्दिष्ट आहे. धरतीला हिरवीगार बनवणे, जैवविविधतेत सुधारणा व संवर्धन आणि भारतीय देशी वृक्षांचे संवर्धन यासाठी आम्ही अथक काम करत आहोत, असेही त्यांनी बोलून दाखवले.

'द इको फॅक्टरी फाऊंडेशन'ने ग्रामीण, शहरी, औद्योगिक व वैयक्तिक शाश्वतता या चार मूलभूत क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले असून त्यासाठी मोहिम सुरू केली आहे. त्याचे उद्देश पुढीलप्रमाणे -

अ) नागरी व औद्योगिक क्षेत्रांत बहुशाखीय मार्गाने जीवनाच्या शाश्वत पद्धतीचा प्रसार करणे.

ब) भारतातील पहिल्या कचरा व्यवस्थापन वाटिकेच्या पर्यावरण उद्योजकतेला मदत व प्रसार करणे

क) शाश्वत भारत कृषी रथाच्या माध्यमातून ग्रामीण पातळीवर व्यवसाय संधी निर्माण करणे

# चिनी विस्तारवादाची पंचसूत्री

**नवी दिल्ली :** भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये नुकत्याच झालेल्या चकमकीमुळे चीनचे विस्तारवादी दादागिरीचे इरादे स्पष्ट झाले आहेत. मात्र,चीनचे इतर देशांवर अतिक्रमण ही नवी गोष्ट नाही. कम्युनिस्ट सरकार सत्तेवर आल्यापासून सर्व शेजारी देशांशी भूप्रदेश ताब्यात घेण्यासाठी चीनची दादागिरी सुरू आहे.

भारताचा अरुणाचल प्रदेश, लडाख, सिक्कीम यासह भूतान आणि नेपाळ गिळंकृत करण्याचा चीनचा डाव आहे. या आक्रमणकारी धोरणाला फाईव्ह फिंगर्स पॉलिसी म्हणून ओळखले जाते. चीनने यापूर्वीच ताब्यात घेतलेला तिबेट हा उजव्या हाताचा पंजा समजून इतर पाच भूभाग ही त्याची ५ बोटं समजली जातात.

चिनी अधिकाऱ्यांनी सन १९९५४ मध्येच हे पाचही भूभाग हे चीनचा अविभाज्य घटक असल्याचे जाहीर केले आहे. त्यापैकी अरुणाचल प्रदेशाचा नेफा प्रांत, सिक्कीम आणि लडाख भारताने अनाधिकाराने ताब्यात ठेवला आहे, असा चीनचा आरोप आहे. चीनचे माजी अध्यक्ष माओ त्से तुंग यांचे फाईव्ह फिंगर्स हे स्वन होते. चीनच्या प्रत्येक राज्यकर्त्यांनीही ते उराशी कवटाळले आहे.

चीनने शालेय अभ्यासक्रमात हे पाचही भूप्रदेश चीनचा भूभाग असल्याचे दाखविले आहे. हे भूप्रदेश चीनचा असल्याचे नकाशेही प्रसिद्ध करण्यात आले आहेत. आजचे चिनी राज्यकर्ते स्पष्टपणे फाईव्ह फिंगर्स पॉलिसीचा उल्लेख करत नसले तरी त्यांच्या कृतीतून त्याचे पडसाद उमटल्याशिवाय रहात नाहीत.

फाईव्ह फिंगर्स पॉलिसी माओचे स्वप्न म्हणून ओळखले जात असले तरीही त्याच्या पूर्वीपासून चीनच्या राज्यकर्त्यांनी या पाचही भूभागांवर दावा केला आहे. चिनी साम्राज्याच्या काळात सन १९०० मध्ये सम्राटाने याचा उल्लेख केला होता. तिबेट चीनचे असून हे पाचही भूप्रदेश तिबेटचे विस्तारित प्रदेश आहेत, असा सम्राटांचा दावा होता. माओ सन १९३४ पासून हा सिद्धांत मांडत आले आहेत.

फाईव्ह फिंगर्सचा सिद्धांत सिद्ध होईल असा कोणताही ऐतिहासिक पुरावा अथवा संदर्भ नसल्याने सध्याचे राज्यकर्ते अधिकृतपणे त्याचा उल्लेख करत नाहीत. मात्र, अगदी आत्तापर्यंत डोकलाम येथे भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झालेल्या जीवघेण्या चकमकीच्या काळातही सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रामध्ये या धोरणाची भलामण केली आहे.

# किल्ले रायगडावरुन येणार स्पर्धेची मुख्य क्रीडा ज्योत

**(पान १ वरुन पुढे...)**

(पानाशिक, मुंबई व पुणे या ८ विभागातील मुख्यालय जिल्ह्याच्या ठिकाणाहून क्रीडा ज्योतींचे आगमन दि. ३१ डिसेंबर २०२२ ते ३ जानेवारी २०२३ या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे- बालेवाडी पुणे येथे समायोजनासाठी येणार आहेत. किल्ले रायगडवरुन आलेली मुख्य क्रीडा ज्योत ५ जानेवारी २०२३ रोजी प्रथम एसएसपीएमएस येथील छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक शिल्प येथे येईल. याच ठिकाणी आठ विभागातून आलेल्या आठ क्रीडा ज्योती एकत्रित येऊन या सर्व क्रीडा ज्योतींचे मुख्य क्रीडाज्योतीत दुपारी १ वाजता समायोजन करण्यात येणार आहे.

ऑलिम्पियन खेळाडू, आंतरराष्ट्रीय खेळाडू, केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कारार्थी यांच्या समवेत लक्ष्मी रोड -डेक्कन, फर्ग्यूसन महाविद्यालय मार्गे, शिव छत्रपती क्रीडा संकुल, महाळूंगे, बालेवाडी येथे ही क्रीडा ज्योत पोहोचणार आहे.

**विभागीय क्रीडा ज्योत रॅलींचा मार्ग**

नागपूर विभागीय रॅलीचा नियोजित मार्ग नागपूर - वर्धा - समृद्धी महामार्गाने शिर्डी - अहमदनगर - येरवडा, अमरावती विभाग रॅली अमरावती - अकोला - शेगांव - खामगांव - शिंदखेड (राजा) - औरंगाबाद - अहमदनगर -येरवडा, औरंगाबाद विभाग रॅली औरंगाबाद- अहमदनगर - येरवडा, लातूर विभाग- लातूर - उस्मानाबाद- येरवडा, कोल्हापूर विभाग- कोल्हापूर - कराड - सातारा - येरवडा, पुणे विभाग रॅली- बारामती ते येरवडा, नाशिक विभागीय रॅलीचा मार्ग नाशिक - संगमनेर-येरवडा आणि मुंबई विभागीय रॅलीचा नियोजित मार्ग गेट वे ऑफ इंडिया - वाशी - लोणावळा - येरवडा असा असणार आहे, अशी माहिती माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे सहसंचालक चंद्रकांत कांबळे व महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे महासचिव नामदेव शिरगांवकर यांनी दिली आहे.

# ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली हजारो कोटींचा गैरव्यवहार

**नवी दिल्ली :** सध्याच्या काळात ऑनलाईन गेमिंग हा प्रकार विशेषत: युवा वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होत असला तरी या आभासी खेळांच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याची बाब उघड झाली आहे. अशा अनेक प्रकरणांचा तपास सक्तवसुली संचालनालय (ईडी) करीत आहे.

अशा मोबाईल गेमिंगच्या गैरकारभारात चिनी कंपन्या आघाडीवर असून त्यांच्या मार्फत थेट विदेशी गुंतवणुकीच्या नावाखाली भारतीय कंपन्यांना मूळ भांडवल पुरवले जाते. विविध मोबाईल पद्वारे पैसे जमा करण्याचे काम भारतीय कंपन्या करतात. बहुतेकदा ही ॲप्स आर्थिक गैरव्यवहारामुळे गुगल प्ले स्टोअरने काढून टाकलेली असतात.

भारतीय कंपन्या बनावट बँक खाती, हवाला अथवा आभासी चलनाचा वापर करून जमा केलेली रक्कम मूळ कंपन्यांना पाठवितात. अशा प्रकारे चीन, सिंगापूर आणि हाँगकाँग या देशांमध्ये हजारो कोटी रुपये पाठविण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे.

अशा गैव्यवहारप्रकरणी ईडीने लिंक्यून टेक्नॉलॉजी, डोकिपे टेक्नॉलॉजी, कोडा पेमेंट्स इंडिया, जेरेना फ्री फायर मोबाईल गेम, ई नगेट्स गेमिंग प यांच्यावर गुन्हे दाखल केले असून अनेक चिनी आणि भारतीय संबंधितांना अटक केली आहे. या सर्व प्रकरणातील गैरव्यवहारांची रक्कम ८ हजार कोटी रुपयांहून अधिक आहे.

# महिलांवरील हिंसाचार रोखा संयुक्त राष्ट्रांचे तालिबानला आवाहन

**काबूल :** महिलांवर होणारे वाढते हिंसाचार आणि त्यांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली रोखण्यासाठी तातडीने पावले उचलावी, असे आवाहन संयुक्त राष्ट्रांच्या वतीने अफगाणिस्तानातील राज्यकर्त्या तालिबानला करण्यात आले आहे.



तालिबानने अफगाणि-स्तानची सत्ता हस्तगत केल्यानंतर सन २०२१ पासून देशातील महिलांवर होणारा हिंसाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. महिलांच्या मूलभूत हक्कांची सर्रास पायमल्ली केली जात आहे. महिलांवर सर्वाधिक अत्याचार होणाऱ्या देशांमध्ये अफगाणिस्तान आघाडीवर आहे, असे अफगाणिस्तानला मदत करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी नियुक्त केलेल्या गटाने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

देशात स्थैर्य, समृद्धी आणि शाश्वत शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने महिलांच्या अधिकारांचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे तालिबान प्रशासनाने महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्या, असे आवाहन संयुक्त राष्ट्र सरचिटणीसांच्या विशेष प्रतिनिधी रोझा ओटनबेव्हा यांनी केले आहे. अफगाणिस्तान आर्थिक संकटातून हात आहे. सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान अवघड होत आहे. महिलांचे आचार विचारस्वातंत्र्य, उदरनिर्वाह चालविण्याचे स्वातंत्र्य, शिक्षणस्वातंत्र्य, सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याचे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. परंपरेच्या नावाखाली, शिस्त आणि नियंत्रणाच्या नावाखाली महिलांवरील हिंसाचाराला सहज सामान्य समजले जात आहे, असे मदतगटाने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणाऱ्या कायदे आणि धोरणांचा देशात अभाव आहे. परंपरेच्या नावाखाली समानता मान्य केली जात नाही. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग नाकारला जातो. दिवसेंदिवस घराघरात, कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक ठिकाणी महिलांवरील हिंसाचारात वाढ होत आहे, असे निरीक्षण मदतगटाने अहवालात नोंदवले आहे.

### चीनमध्ये परतणे निरर्थक;

# भारतातच राहण्याची दलाई लामा यांची ग्वाही

**शिलाँग :** चीनमध्ये परतण्याचा आपला कोणताही विचार नाही. चीनमध्ये परत जाणे निरर्थक आहे. आपण आयुष्यभर भारतातच राहणे पसंत करू, असे बौद्ध धर्माचे सर्वोच्च गुरू आणि तिबेटच्या विस्थापित सरकारचे प्रमुख दलाई लामा यांनी स्पष्ट केले.



भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये अरुणाचल प्रदेशमध्ये नुकत्याच झालेल्या चकमकीच्या पार्श्वभूमीवर दलाई लामा यांनी हे विधान केले आहे.

भारताने दलाई लामा आणि असंख्य तिबेटी नागरिकांना दिलेला आश्रय आणि तिबेटच्या स्वातंत्र्य लढ्याला भारताकडून मिळणारे समर्थन हे भारत आणि चीन यांच्यामधील तणावाचे एक महत्त्वाचे कारण आहे. दलाई लामा आणि त्यांचे सहकारी सध्या हिमालयाच्या कुशीतील कांगडा येथे निवास करीत आहेत. चीन आपल्या शेजारी राष्ट्रांच्या भूप्रदेशावर डोळा ठेऊन आहे. चीनची ही विस्तारवादी भूमिका अतिशय अयोग्य आहे. चीनला जर जगात शांतता प्रस्थापित व्हावी असे वाटत असेल तर त्यांनी आपली विस्तारवादी आणि दादागिरी करण्याची मुजोर वृत्ती सोडून द्यायला हवी, असे आवाहन दलाई लामा यांच्या सरकारने केले आहे.

# खरी भीमशक्ती माझ्याच पाठीशी : रामदास आठवले



**कल्याण :** वंचित बहुजन आघाडीने शिवसेना ठाकरे गटाशी युती केली असली तरी खरी भीमशक्ती माझ्याच पाठीशी आहे. त्यामुळे राज्यात भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गट यांची महायुती बलशाली आहे, असा दावा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी विशेष मुलाखतीदरम्यान बोलताना केला.

बहुजन वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांनी चर्चा करून शिवशक्ती भीमशक्ती एकत्र आल्याची घोषणा केली. राष्ट्रवादी काँग्रेसनेही वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत समाविष्ट करून घेण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलणार असल्याचा दावा काही विश्लेषक करीत आहेत. त्याचा फटका भाजपला बसू शकतो, असेही म्हटले जात आहे.

रामदास आठवले यांना मात्र हा दावा मान्य नाही. प्रकाश आंबेडकर यांनी शिवसेनेबरोबर जाण्याचा निर्णय घेतला आहे. असा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना निश्चितपणे आहे. मात्र, खरी भीमशक्ती, आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते आपल्या रिपब्लिकन पक्षाच्या पाठीशी आहेत. त्यामुळे शिवसेना उद्धव गटाने कोणाशीही युती आणि आघाडी केली तरी महायुतीला काही फरक पडणार नाही. महायुतीची ताकद सरस आहे, असा दावा आठवले यांनी केला.

वंचित बहुजन आघाडी आणि ठाकरे गटाची युती झाल्यावर शिवशक्ती आणि भीमशक्ती एकत्र आल्याचा दावा ठाकरे गटाकडून केला जात आहे. मात्र, हा दावा अयोग्य आहे. खरी शिवशक्ती आणि भीमशक्ती शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या कारकिर्दीत एकत्र आली होती. त्यात आपला सहभाग होता, असे आठवले यांनी नमूद केले.

टीका करायला कोणी नाही म्हणून...

शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटातील बहुतेक आक्रमक नेते ठाकरे यांच्यापासून दूर गेले आहेत. त्यामुळे आपल्या विचाराचे समर्थन करून विरोधकांवर टीकेची तोफ डागणारे नेतेच त्यांच्याकडे उरले नाहीत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी माझ्या जुन्या सहकारी सुषमा कंधारे यांना आपल्या पक्षात घेतले आहे. त्या सक्रिय नेत्या आहेत. त्यांना उपनेतेपद दिले आहे. मात्र, त्यांना कायम टीका करण्याचे काम दिले आहे. सतत टीका करणे योग्य नाही, असा सल्ला आठवले यांनी कंधारे यांना दिला.

# पोक्सो अंतर्गत खटल्यापैकी २५ टक्के प्रकरणात प्रेमाचे संबंध

**नवी दिल्ली :** बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल केलेल्या खटल्यात तब्बल २५ टक्के प्रकरणे प्रेमसंबंधातून घडतात आणि शरीरसंबंध सहमतीने घडलेले असतात, असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. या कायद्याबाबत कायदे करणाऱ्यांनी पुनर्विचार करावा, या भारताच्या सरन्यायाधीशांनी केलेल्या आवाहनाला या सर्वेक्षण अहवालाने दुजोरा दिला आहे.

एनफोल्ड प्रोक्टिव हेल्थ ट्रस्ट आणि युनिसेफ यांनी महाराष्ट्र, प. बंगाल, आसाम या रापोक्सोज्यातील पोक्सो कायद्यानुसार चालविल्या गेलेल्या ७ हजार ६४ खटल्यांच्या निकालपत्राचा अभ्यास करून आपला अहवाल सादर केला आहे. स्वागता राहा आणि श्रुति रामकृष्णन यांनी माहितीचे विश्लेषण करून अहवालाचे लेखन केले आहे. हा अहवाल १० डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला.




अभ्यास करण्यात आलेल्या ७ हजार ६४ खटल्यांपैकी १ हजार ७१५ खटल्यांमध्ये आरोपी आणि फिर्यादी यांच्यात प्रेमसंबंध होते आणि सहमतीने शरीरसंबंध होते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. अशा प्रेमसंबंध असणाऱ्या अल्पवयीन मुलींपैकी ५० टक्के १६ ते १८ वर्ष वयोगटातील आहेत.

अभ्यास करण्यात आलेल्या एकूण खटल्यांपैकी १ हजार ५०८ प्रकरणांमध्ये मुलींनी तपास सुरू असताना पोलिसांसमोर अथवा सुनावणीदरम्यान न्यायालयात आरोपीबरोबर प्रेमसंबंध अथवा सहमतीने शरीरसंबंध असल्याची कबुली दिली आहे.

न्यायव्यवस्थेकडून पालकांच्या विरोधात जाऊन प्रेमसंबंध ठेवण्यास अल्पवयीन मुलींना रोखण्यात येते. अशा मुली प्रियकरासोबत पळून गेल्या असतील तर पोलिसांमार्फत त्यांना परत आणण्यास प्राधान्य दिले जाते, असे निरीक्षण अहवालात नोंदविण्यात आले आहे. अनेकदा आरोपीने मुलींना दिलेले लग्नाचे वचन पूर्ण करण्यासाठी दबाव आणण्याच्या उद्देशाने खटले दाखल केले जात असल्याचेही अहवालात म्हटले आहे.

अल्पवयीन मुलींची सहमती असेल तरीही असे शरीरसंबंध कायदेशीर मानले जात नसले तरीही पोक्सोअंतर्गत खटल्यांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. आरोपीची मुक्तता होण्यामागे सहमती हेच प्रमुख कारण आहे, असेही अहवालात स्पष्ट केले आहे.

भारताचे सरन्यायाधीश यशवंत चंद्रचूड यांनी बाल संरक्षण परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात कायदे मंडळाचे या विषयाकडे नुकतेच लक्ष वेधले आहे. पोक्सो कायदा १८ वर्षाखालील शरीरसंबंध असलेल्या प्रकरणात सर्व आरोपींना सरसकट दोषी ठरवतो. त्यामध्ये सहमतीचा विचार केला जात नाही. अशा खटल्यांचा निकाल देताना न्यायाधीशांची अवस्था अवघड होते. त्यामुळे कायदे करणाऱ्यांनी त्याचा विचार करावा, असे आवाहन न्या. चंद्रचूड यांनी केले आहे.

# ... तर कोकणचे शेतकरीही करतील आत्महत्या

**रत्नागिरी :** पिकाचे नुकसान किंवा कर्जबाजारीपणामुळे कोकणातील एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केलेली नाही. मात्र, भरल्या बागायतीची नासधूस करणाऱ्या वानर आणि माकडांमुळे त्यांच्यावर जीव देण्याची वेळ येऊन ठेपली आहे, असा इशारा कोकणातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

कोकणातील शेतकरी भाताची हंगामी शेती करण्याबरोबरच आंबा, काजू, सुपारी, कोकम याची बाग सांभाळण्याचे काम करतो. हीच कोकणच्या शेतकऱ्यांसाठी नगदी पिके आहेत. त्यांचे आर्थिक गणित त्यावरच अवलंबून आहे. मात्र, वानर आणि माकडांच्या उपद्रवामुळे त्यांचे अर्थचक्र विस्कळीत होण्याची वेळ येऊन ठेपली आहे.



या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी जिल्ह्यातील एक शेतकरी अविनाश काळे यांनी लाक्षणिक उपोषण केले. कोकणातील हजारो शेतकऱ्यांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून अथवा समाजमाध्यमातून पाठींबा दिला आहे. कोकणातील फळबागांमध्ये वानर आणि माकडांच्या झुंडीच्या झुंडी येऊन आंबा, सुपारी, काजू, कोकमाचे नुकसान करत आहेत. काही शेतकऱ्यांच्या घरात परवाना असलेल्या बंदुका असल्या तरी वानर आणि माकडांना मारण्यास बंदी आहे. केवळ बंदुकीचा बार काढून किंवा फटाके उडवून वानरा, माकडांना घाबरविण्याचा उपाय कालबाह्य झाला आहे. ती आता गोळीबाराच्या आणि फटाक्यांच्या आवाजाला सरावली आहेत. त्यामुळे हातावर हात धरून बागेचे नुकसान पहात राहणे एवढेच शेतकऱ्यांच्या हाती राहिले आहे. माकड आणि वानर हे संरक्षित प्राणी असल्याने त्यांच्या शिकारीवर बंदी आहे. त्यामुळे त्यांची संख्या ३५ वर्षात १०० पटींहूनही अधिक वाढली आहे. त्यांच्या उपद्रवामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासनाने हिमाचल प्रदेशाच्या धर्तीवर माकड, वानर यांना उपद्रवी प्राणी म्हणून घोषित करावे आणि त्यांचा बंदोबस्त करावा, अशी कोकणातील शेतकऱ्यांची मागणी आहे.

# निराश न होता पक्षसंघटन वाढविणार : ओवेसी

**हैदराबाद :** गुजरात विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाला खातेही खोलता आले नसले तरी निराश होणार नाही. पुन्हा नव्या जोमाने राज्यात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करू, असे ऑल इंडिया मजलिस ए उत्तेहादुल मुसलमिन पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी सांगितले.

गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपा बरोबरच काँग्रेस पासून अंतर राखण्याचा निर्णय घेऊन आम आदमी पक्ष आणि ओवेसी यांचा एम आय एम यांनी स्वतंत्रपणे निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला. ही निवडणूक लढवताना उल्लेखनीय कामगिरी करू असा विश्वास ओवेसी यांनी प्रचारादरम्यान व्यक्त केला होता. मात्र, या



निवडणुकीत एम आय एम ला खाते उघडण्यातही यश मिळाले नाही. पक्षाने उभे केलेले सर्व १३ उमेदवार निवडून येण्यात अपयशी ठरले.

निवडणुकीत पक्षाला आलेल्या अपयशामुळे खचून न जाता यापुढील काळात राज्यात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी अधिक जोमाने प्रयत्न करू, असे ओवेसी यांनी निवडणूक निकालानंतर ट्विटरद्वारे सांगितले. निवडणुकीच्या काळात पक्षाला मतदान करणारे मतदार आणि पक्षाच्या उमेदवारांसाठी दिवसरात्र एक करून काम करणारे कार्यकर्ते यांचे त्यांनी आभार मानले.

# सोलापूर जिल्हा परिषदेच्या डेप्युटी सीईओ चंचल पाटील यांना प्रमोशन; साताऱ्याला बदली

## एस एन कोहिनकर नवे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

**सातारा :** जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील यांची प्रमोशनने बदली झाली आहे. त्यांना साताऱ्याच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालकपदी नियुक्ती देण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदी अहमदनगर जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी एस एन कोहिनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



तसेच सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक पदी विभागीय आयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त एम जी सांगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.


चंचल पाटील यांची सोलापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदी २०१७ साली नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांची सोलापूर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती झाली.

यादरम्यान त्यांनी एक वर्ष समाज कल्याण अधिकारी म्हणून प्रभारी पदभार सांभाळला आहे. तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांची पुण्याला बदली झाल्यानंतर त्यांचाही अतिरिक्त पदभार चंचल पाटील यांच्याकडे आला होता. सुमारे पाच वर्ष त्यांनी सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये सेवा बजावली आहे, आता त्या प्रमोशनने साताऱ्याला जात आहेत.

# भारताला सोसावे लागणार तीव्र उष्णतेचे चटके

**नवी दिल्ली :** जागतिक हवामान बदलामुळे भारताला आगामी काळात तीव्र उष्णतेचे चटके सोसावे लागणार आहेत. त्यामुळे आरोग्यविषयक समस्या, बेकारी आणि पर्यायाने सकल राष्ट्रीय उत्पन्नात कमालीची घट असे दुष्परिणाम सोसावे लागतील, असा इशारा संयुक्त राष्ट्रसंघ आणि केरळ राज्य सरकार यांनी संयुक्तपणे तयार केलेल्या अहवालात देण्यात आला आहे.

सध्याच्या काळातही उन्हाळ्याचा वाढता कालावधी, उष्णतेची वाढती तीव्रता, अवकाळी पाऊस आणि लहरी हवामान याचा अनुभव भारतीय नागरिक घेतच आहेत. तशात या अहवालाने भारताबरोबरच भारतीय उपखंडातील देशांची चिंता अधिक वाढली आहे.




आगामी काही वर्षात भारत आणि भारतीय उपखंडात उष्णतेच्या लाटा मोठ्या प्रमाणावर निर्माण होण्याची शक्यता या अहवालात नमूद करण्यात आली आहे. विशेषतः सन २०३५ आणि त्या पुढच्या २५ वर्षाच्या काळात या प्रदेशाला प्रचंड उन्हाळा सहन करावा लागणार आहे. या उष्णतेच्या लाटा सर्वसामान्य नागरिकांना सहन करण्याच्या मर्यादित असणार नाही असं निरीक्षणही यामध्ये नोंदविण्यात आले आहे.

कृषिप्रधान असलेल्या भारत देशात मोठी लोकसंख्या रोजगारासाठी शेतीवर अवलंबून आहे शेतीची बहुतेक कामे दिवसाच्या वेळी केली जात असल्यामुळे उन्हाळ्याच्या लाटा आल्यास या कामांना खीळ बसणार आहे. अर्थातच शेती आणि शेतीविषयक अन्य रोजगारांमध्ये गुंतलेल्या लोकांच्या अर्थकारणावर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे त्यामुळे भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात उल्लेखनीय घट होऊ शकते असा इशारा या अहवालात देण्यात आला आहे. भारताच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटांचा प्रभाव अधिक असणार आहे. भारतातील एकूण कार्यक्षम मनुष्यबळाच्या तब्बल ७० टक्के मनुष्यबळ हे कोरड्या हवामानाच्या आणि उष्णतेने प्रभावित होऊ शकणाऱ्या भूभागात राहत असल्यामुळे भारतीयांच्या कार्यक्षमतेवर हवामानबदलाचा विपरीत परिणाम होऊ शकतो असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# धर्मवीर की स्वराज्यरक्षक?

## छत्रपती संभाजी महाराजांच्या उपाधीवरुन वाद पेटला

## अजित पवार आणि भाजपा-शिंदे गट आमनेसामने

**मुंबई :** छत्रपती संभाजी महाराज यांना धर्मवीर असे संबोधू नका, तर त्यांना स्वराज्य रक्षक अशी उपाधी वापरा, असं वक्तव्य राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी हिवाळी अदिवेशनात केल्यानंतर त्यावरुन आता वादंग सुरु झाला आहे. तर अजित पवार यांच्या या वक्तव्यानर शंभूराजे देसाई यांनी जोरदार आक्षेप घेतला आहे. छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीर आणि धर्मरक्षकच होते. त्यांनी हिंदू धर्मासाठी ४० दिवस अनन्य हाल भोगले, असं प्रत्युत्तर देसाईंनी दिलंय. राज्यात याचा मोठा उद्रेक होईल, असा इशाराही शंभूराजे देसाई यांनी दिलाय. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीरही होते आणि स्वराज्य रक्षकही होते असं म्हटलंय.

**काय म्हणाले होते अजित पवार**

हिवाळी अधिवेशनात अजित पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली होती. निष्पापांना तुरुंगात टाकण्यापेक्षा महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना तुरुंगात टाका, त्यांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडेल असं ते म्हणाले. महाराष्ट्रात अंधश्रद्धेला खतपाणी घालू नये असं ते म्हणाले. बाल शौर्य पुरस्कार हा किमान स्वराज्यरक्षक छ्त्पती संभाजी महाराज यांच्या जयंतीदिनी द्यावा अशी मागणी करताना त्यांनी छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीर नव्हते तर स्वराज्य रक्षक होते. असं ते म्हणाले. काही जण मुद्दामुन त्यांना धर्मवीर म्हणतात. संभाजी महाराजांनी कधीही धर्मा पुरस्कार केला नाही असं ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांनीही हिंदवी स्वराज्याची स्थापना केली असं अजित पवार म्हणाले होते. अनेक जण जाणीवपूर्वक दर्मवीर असा उल्लेख करतात असं ते म्हणाले.

**लोका सांगे ब्रह्मज्ञान, शंभूराजेंची टीका**

महापुरुषांच्या अवमानावरुन इतरांना बोलणारे अजित पवार हे लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वता कोरडे पाषाण अशी टीका शंभूराजे देसाई यांनी केलीय. हे वक्तव्य निषेधार्ह असल्याचं त्यांनी म्हटलय. राज्यात याचा उद्रेक होईल, असा इशारा शंभूराजे देसाईंनी दिलाय. पुढची हजारो वर्ष छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीरच राहतील. असंही ते म्हणाले.

**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले**

सगळ्या अर्थानं छत्रपती संभाजी महाराजांनाी धर्माचं रक्षण केलं. राष्ट्रधर्म, स्वधर्म आणि हिंदू धर्म या तिन्हीचं रक्षण छत्रपती संभाजी महाराजांनी केलं. त्यांची हत्या करण्याचं मुख्य कारण हे धर्मांतरण होतं. औरंगजेब त्यांचं धर्मांतर करु इच्छित होता. हालअपेष्टा होऊन त्यांचं बलिदान झालं. शरिराचे तुकडे झाले तरी स्वधर्म, स्वराज्याची भाषा त्यांनी सोडली नाही. अजित पवार किंवा त्यांच्या विचारांच्या लोकांनी कितीही प्रयत्न केला तरी छत्रपती संभाजी महाराज हे स्वराज्य रक्षक तर होते, पण धर्मवीरही होतेच, असं देवेंद्र फडणवीस म्हणालेत.

# गुजरातपेक्षा कर्नाटकात चांगली कामगिरी करू: 'आप'चा विश्वास

**बंगळुरू :** आगामी वर्षात होणाऱ्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत गुजरात निवडणुकीपेक्षा अधिक चांगली कामगिरी करू, असा विश्वास आम आदमी पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला आहे. या निवडणुकीत अधिकाधिक उमेदवार उभे करण्या ऐवजी निवडून येऊ शकणाऱ्या चारित्र्यवान उमेदवारांना तिकीट देण्यावर पक्षाचा भर असेल, असेही त्यांनी सांगितले.

आम आदमी पक्षाने भारतीय जनता पक्षाचा पराभव करून दिल्ली महापालिकेची सत्ता ताब्यात घेतली आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीतही आम आदमी पक्षाला मिळालेल्या मतांचे प्रमाण उल्लेखनीय आहे.



या पार्श्वभूमीवर पक्ष कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले असून कर्नाटक विधानसभा निवडणुकीत पक्षाची कामगिरी उंचावलेली दिसेल, असा विश्वास 'आप'चे प्रदेश उपाध्यक्ष भास्कर राव यांनी व्यक्त केला. राव हे बंगळुरूचे निवृत्त पोलीस आयुक्त आहेत.

कर्नाटक विधानसभेत एकूण २२४ मतदारसंघ आहेत. आम आदमी पक्ष त्यापैकी ५० ते ६० जिंकून येण्यासारख्या जागांवर लक्ष केंद्रित करणार आहे. अशा मतदारसंघात स्वतःच्या क्षमतेवर निवडून येणारा, चारित्र्यवान, कार्यक्षम आणि राजकारणात नवा चेहरा असलेला उमेदवार देण्यावर पक्षाचा भर असणार आहे. गुजरातमध्ये निवडून आलेल्या पाच उमेदवारांपैकी कोणालाही बाहुबळ किंवा पैशाचे पाठबळ नव्हते. हे सर्व उमेदवार स्वतःच्या क्षमतेवर निवडून आले आहेत. कर्नाटकातही पक्षाकडून असेच उमेदवार दिले जातील, असे राव यांनी स्पष्ट केले.

कर्नाटक निवडणूक प्रचारात दिल्लीचे मुख्यमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय निमंत्रक अरविंद केजरीवाल यांच्यासह अनेक केंद्रीय नेते प्रचारासाठी येणार आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये पक्षाची विश्वासार्हता आणि उमेदवारांची निवडून येण्याची क्षमता वाढेल, असा विश्वास स्थानिक नेत्यांमध्ये आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जादू हिमाचल प्रदेश निवडणुकीत चालली नाही. तशीच कर्नाटकमध्येही ती चालणार नाही, असा दावाही ते करतात.

# २०२३ मध्ये मोदी-भाजपाचं भवितव्य ठरणार

## नववर्ष राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचं, १० राज्यांत होणार विधानसभा निवडणुका, महाराष्ट्रातही रंगणार रमधुमाळी

**नवी दिल्ली :** गुजरात विधानसभा निवडणुकांत मिळालेल्या विजयानं विश्वास बळावलेल्या नरेंद्र मोदी आणि अमित शाहा याच्या जोडगोळीसाठी २०२३ हे साल अत्यंत महत्त्वाचे असणार आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांची तयारी भाजपानं सुरु केली आहे. २०२४ साली पुन्हा बहुमतानं सत्तेत येण्याचे प्रयत्न सुरु आहेत. अशा स्थितीत येणारं २०२३ हे साल अत्यंत महत्त्वाचं असणार आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा, नितीश कुमार राष्ट्रीय पातळीवर सक्रिय होण्यासाठी करत असलेले प्रयत्न, आपच्या अरविंद केजरीवालांना राष्ट्रीय राजकारणाचे लागलेले वेध या सगळ्यात भाजपासमोर नव्या वर्षांत अनेक आव्हान असणार आहेत. आठ-नऊ वर्षांच्या एन्टी इक्मबन्सीचा फटकाही भाजपाला बसणार का, असा प्रश्नही उपस्थित करण्यात येतोय.

**नव्या वर्षांत १० राज्यांत विधानसभा निवडणुका**

नव्या वर्षांत १० राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. या १० राज्यांतं ९३ लोकसभा मतदारसंघ आहेत. एकूण लोकसभेच्या जागांपैकी ते १७ टक्क्यांपर्यंत आहेत. त्यामुळं या १० राज्यांत विजय मिळवण्याचं मोठं आव्हान मोदी-शाहा यांच्यासमोर असणार आहे. २०४७ पर्यंत भाजपाचीच सत्ता देशात राहील अशा विश्वास भाजपाचे धुरिण व्यक्त करत असले, तरी प्रत्यक्षात यासाठी मोठे प्रयत्न संघटनात्मक पातळीवर करावे लागणार असल्याचं सांगण्यात येतंय.

**कोणत्या १० राज्यांत होणार आहेत निवडणुका**

२०२३ सालात राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, तेलंगणा या पाच मोठ्या राज्यांचा समावेश आहे. तर ईशान्येकडील त्रिपुरा, मेघालय, मागालँड आणि मिझोरम या राज्यांतही निवडणुका होणार आहेत. यांच्यासह जम्मू-काश्मीरमध्येगी या वर्षी निवडणुका होण्याची शक्यता आहे.

**या १० राज्यांत किती लोकसभा जागा**

**पाहुयात कोणत्या राज्यात किती लोकसभा जागा आहेत**

**राजस्थान - २५, मध्यप्रदेश - २९, छत्तीसगड -११, कर्नाटक - २८, तेलंगणा - १७, जम्मू काश्मीर - ६, ईशान्यकडची राज्ये - ६.**

२०२४ ट्या लोकसभा निवडणुकांसाठी ही सगळीच राज्ये भाजपाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. या १० राज्यांत लोकसभेच्या १७ टक्के जागा येतात.

**महाराष्ट्रातही महत्त्वाच्या निवडणुका**

राज्यातही मिनी विधानसभा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि सुमारे १५ महानगरपालिकांच्या निवडणुका येत्या वर्षआत होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिकेचा संघर्ष भाजपासाठी अत्यंत महत्त्वाचा मानण्यात येतोय.




## वादानं झाकोळलेलं अधिवेशन

कोरोनामुळं गेल्या दोन वर्षांत नगपूरला हिवाळी अधिवेशन झालं नव्हतं. त्यामुळं आताचं अधिवेशन विदर्भासाठी महत्त्वाचं होतं. किमान हिवाळी अधिवेशनाच्या निमित्तानं विदर्भातील प्रश्नांची चर्चा व्हावी, काही प्रश्न सुटावेत अशी अपेक्षा गैर मानता येणार नाही. नागपूरच्या अधिवेशनात अधिक मोर्चे येत असतात. या वेळीही बेरोजगार, 'आपलं सरकार' उपक्रमातील कर्मचारी आदींसह सात भव्य मोर्चे आले. गेल्या सहा महिन्यांपूर्वी सत्तांतर झाल्यानंतरचं हे तसं पहिलंच अधिवेशन. त्यामुळं सरकारची प्रतिष्ठा पणाला लागलेली आणि विरोधी पक्षही सरकारची कोंडी करायचीच या हेतूनं मैदानात उतरलेला. अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात विविध संसदीय आयुधं वापरून सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्यात विरोधकांना यश आलं असलं, तरी त्यातून सामान्यांच्या हाती काय पडलं, हा प्रश्न उरतोच. अधिवेशनावर ९८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. म्हणजे एका दिवसाला दोन कोटी रुपयांहून अधिक खर्च. हा खर्च जनतेच्या खिशातलाच असतो. त्यामुळं जनतेच्या हिताचे किती धोरणात्मक निर्णय घेतले गेले, हे महत्त्वाचं असतं. अधिवेशनातील पहिल्या पाच दिवसांचं कामकाज पाहिलं, तर सत्ताधारी आणि विरोधकांत आरोप-प्रत्यारोपच अधिक झाले. दोन्ही बाजूंनी अधिकारांच्या उल्लंघनाचे आणि संसदीय परंपराना नख लावण्याचेच प्रकार अधिक घडले. त्यामुळं गंभीर विषय मागं पडले. सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याचा विरोधकांचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांनी गोंधळ घालून हाणून पाडला. सभागृह चालवण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांची असते; परंतु तेच गोंधळ घालायला लागले, तर कसं व्हायचं? नागपुरातलं सत्ताधाऱ्यांचं वर्तन तसंच होतं. विरोधकांनाही अनेक आयुधं वापरून सत्ताधाऱ्यांकडून चर्चा घडवून आणता आली असती; परंतु सत्ताधाऱ्यांनी रचलेल्या डावाचे ते बळी ठरले. विधिमंडळाच्या कामकाजावर बहिष्कार घालायचा, वारंवार 'पन्नास खोके, एकदम ओके,' 'निर्लज्ज सरकार' अशा घोषणा देऊन सभागृहाच्या बाहेर आंदोलन करणं म्हणजे सत्ताधाऱ्यांना सभागृहात हवं ते करण्याची मोकळीक देण्यासारखंच होतं. अधिवेशनाचा आता दुसरा आणि अंतिम आठवडा आजपासून सुरू होतो आहे. अशा काळात तरी जबाबदारीनं काम व्हावं, पटलावरील विधेयकांवर सांगोपांग चर्चा व्हावी आणि जनतेच्या पदरात काहीतरी पडावं अशी अपेक्षा गैर मानता येणार नाही. झोपडपट्टीवासीयांसाठी राखीव असलेल्या नागपूर सुधार प्रन्यास (एनआयटी) च्या जमिनीच्या प्रकरणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अडचणीत आले होते. हिवाळी अधिवेशनातही सलग चार दिवस विधानसभेच्या आतमध्ये आणि विधानभवनाच्या पायऱ्यांवरदेखील हा मुद्दा गाजला. तसंच अधिकाऱ्यांनी आपल्याला माहितीच दिली नाही, असं सांगत शिंदे यांनी तो आदेश मागे घेतला. शिंदे यांनी उच्च न्यायालयात सादर केलेला सुधारित आदेश न्यायालयानं मान्य करीत हा मुद्दा निकाली काढला; मात्र 'एनआयटी'च्या अधिकाऱ्यांनी माहिती न दिल्यानं अनवधानानं ही चूक झाल्याचं शिंदे यांच्यातर्फे सुनावणी दरम्यान कबूल करण्यात आलं. याचिकाकर्त्या पक्षानंही न्यायालयाचं याकडं लक्ष वेधलं; मात्र यावर युक्तिवाद ऐकण्याची ही वेळ नसल्याचं न्यायालयानं स्पष्ट केलं. त्यानुसार, ११ जानेवारी रोजी पुढील सुनावणी निश्चित केली. तोपर्यंत या खटल्यातील मुख्य मुद्द्यावर परिणाम करणारे इतर अनेक घटक स्पष्ट झाले असतील, असंही नमूद केलं. ही बाब न्यायप्रविष्ठ असली, तरी एखाद्या खासगी संस्थेला परस्पर भूखंड दिल्याचा आदेश मागं घेण्याची नामुष्की शिंदे यांच्यावर ओढवली. 'एनआयटी'च्या अधिकाऱ्यांनी ही याचिका प्रलंबित असल्याचं निदर्शनास आणून न दिल्यानं ही वेळ आल्याचं शिंदे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सादर केलेल्या माहितीतून समोर आलं आहे. विरोधकांना मुख्यमंत्र्यांना कोंडीत पकडण्याची ही नामी संधी होती; परंतु जयंत पाटील यांचं निलंबन करून सरकारनं विरोधकांना आक्रमक होण्यास भाग पाडलं आणि मूळ मुद्दा दुर्लक्षित राहिला. सत्ताधाऱ्यांची ही चाल यशस्वी ठरली. दुसरीकडं खा.राहुल शेवाळे यांच्यावर एका महिलेनं केलेले आरोप आणि दिशा सालियन आत्महत्या प्रकरण या दोन्ही राज्य सरकार आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे दिलेले आदेश हा ही परस्परांना शह देण्याचाच प्रकार आहे. लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या असलेल्या भूमिकेचा त्यांनाच विसर पडला असून, ते शह-काटशहासाठी सभागृहांचा दुरुपयोग करीत असल्याचं पहिल्या आठवड्यातून स्पष्ट दिसलं. यापुढं तरी चांगलं काम व्हावं, ही अपेक्षा.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रिक करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.
सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर.
RNI Reg. No: MAHMAR/17902/1999

**मानवी स्वभावाला काय हवं असतं ? सर्वांत महत्त्वाचं म्हणजे त्याला शांती आणि प्रेम हवं असतं. प्रत्येकाला शांततेत जगायचं असतं आणि आजूबाजूच्या लोकांकडून प्रेम मिळवायचं असतं. शांतता आणि प्रेम ही इस्लामची मागणी आहे तसंच मानवी स्वभावाचा तो धर्म आहे.**



# शांतता आणि आस्थेचा धर्म

**प्रा. रजिया इनामदार**

सर्वांच्या आध्यात्मिक, शारीरिक आणि मानसिक कल्याणासाठी प्रेम, आपुलकी आणि सामाजिक जबाबदारी प्रस्थापित करण्यासाठी शांतता आणि सौहार्दाच्या कल्पनांवर आधारित इस्लामची निर्मिती करण्यात आली. या धर्माला सर्वशक्तिमान देवानं दिलेलं 'इस्लाम' हे नाव (कुरआन ५:४) हा अरबी शब्द आहे, ज्याचा शाब्दिक अर्थ आज्ञाधारक आणि शांती असा होतो. 'सलमा' या अरबी मूळ शब्दाचा अर्थ 'शांतता, शुद्धता, अधीनता आणि आज्ञाधारकता' असा होतो आणि त्यातून इस्लामची उत्पत्ती झाली आहे. 'इस्लाम' म्हणजे अल्लाहला समर्पित असलेल्या आणि त्याच्याशी आणि त्याच्या सृष्टीबरोबर शांतता शोधणाऱ्यांनी घेतलेला मार्ग होय. पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) च्या मते मुस्लिम त्याच्या बोलण्यानं किंवा कृतीनं इतरांचं नुकसान करत नाही. प्रत्येक धर्म किंवा व्यवस्थेचा शब्दांचा एक संच असतो, ज्याला त्या धर्माची किंवा व्यवस्थेची संपूर्ण माहिती असणं आवश्यक आहे. इतर प्रत्येक धर्माप्रमाणं इस्लामचेही स्वतःचे नियम आहेत. इस्लाम हे निसर्गाच्या मागण्यांचं उत्तर आहे. हे खरं तर मानवी स्वभावाचं मॉडेल आहे. यामुळंच कुराण आणि हदीसमध्ये इस्लामला निसर्गाचा धर्म म्हटलं गेलं आहे. एकदा एक माणूस प्रेषित मुहम्मद यांच्याकडं आला आणि त्यानं त्याला विचारलं की, आपण एका विशिष्ट बाबतीत काय करावं? पैगंबरांनी उत्तर दिलं, 'मनापासून सल्ला घ्या.' मनापासून म्हणजे अक्कल. म्हणजे एखाद्याची अक्कल जे म्हणेल ती इस्लामचीही मागणी असेल. इस्लामची एक शिकवण अशी आहे, की जेव्हा दोन किंवा अधिक लोक भेटतात, तेव्हा त्यांनी एकमेकांना अस्सलमु-अलेकुम (शांती असो) या शब्दांनी अभिवादन केलं पाहिजे. त्याचप्रमाणं दिवसातून पाच वेळा नमाज किंवा प्रार्थना ही इस्लाममधील सर्वोच्च उपासना आहे. हे खऱ्या धर्माच्या आत्म्याचं सार आहे. ज्याचं ध्येय आध्यात्मिक उन्नती आहे. ही या आध्यात्मिक उन्नतीची अंतिम अवस्था आहे. जिला कुराणमध्ये 'विश्रांतीचा आत्मा' असं संबोधलं आहे. अशाप्रकारे इस्लामिक दृष्टिकोनातून खरा आणि परिपूर्ण व्यक्ती तो आहे, जो आध्यात्मिक विकासाच्या अशा स्तरावर पोहोचला आहे, जिथं शांतता आणि शांतता असते. जेव्हा एखादी व्यक्ती ती शांतता प्राप्त करते, तेव्हा इतरांना त्याच्याकडून शांततेपेक्षा काहीही कमी मिळणार नाही. त्याची तुलना अशा फुलाशी केली जाऊ शकते, जे केवळ त्याचा सुगंध माणसाला पाठवू शकते, त्याला एक अप्रिय गंध सोडणं अशक्य आहे. इस्लाम भौतिक विचार करण्याऐवजी आध्यात्मिक विचार करण्यास भाग पाडतो. ही आध्यात्मिक उन्नती सहिष्णुता निर्माण करते. लोकांना क्षमा करायला आवडतं. ते सूड घेण्याचं टाळतात. ते द्वेषासाठी प्रेम परत करतात. या प्रकारचा स्वभाव शांतता आणि परस्पर आदर स्थापित करण्यास इस्लाम बांधील आहे. अशा प्रकारे, इस्लामिक गूढवाद, व्यावहारिक अर्थानं, चांगल्या आणि शांत समाजाची गुरुकिल्ली आहे.

पैगंबरांच्या जीवनातून एक महत्त्वाचा धडा शिकायला हवा तो म्हणजे हिंसेच्या सामर्थ्यापेक्षा शांततेची शक्ती अधिक मजबूत असते. पैगंबरांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात इतर कोणत्याही शक्तीपेक्षा जास्त वापरलेली शक्ती ही शांतता होती. उदाहरणार्थ, जेव्हा मक्का जिंकली, तेव्हा त्यांच्या सर्व थेट विरोधकांना, ज्यांनी त्याच्यावर अत्याचार केले, त्यांना त्यांच्या गावाबाहेर काढले, त्यांच्यावर लष्करी हल्ले केले आणि त्यांचं नुकसान केलं, ते लोक निःसंदिग्धपणे युद्ध गुन्हेगार होते आणि म्हणून, विजेत्यांकडून फाशीची शिक्षा अपेक्षित होती. जी त्या वेळी सामान्य होती, तरीही पैगंबर त्यांना काहीच बोलले नाहीत. ते म्हणाले, 'जा, तुम्ही सर्व मोकळे आहात.' थडग्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या पुरुषांसाठी, या उदात्त हावभावानं हिंसेपेक्षा शांततेचं श्रेष्ठत्व दाखवून दिलं. प्रेषितांच्या उच्च नैतिक वर्तनाचा परिणाम म्हणजे त्यांनी त्वरित इस्लामचा स्वीकार केला. सध्याच्या 'मुस्लिम' च्या मूलगामी राजकीय अजेंडाचा इस्लामशी काहीही संबंध नाही. इस्लाम एक संपूर्ण जीवन संहिता आहे आणि जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये शांतता प्रदान करण्याचं वचन देतो. इस्लाम हा १४०० वर्षे जुना धर्म आहे आणि त्याचे 'प्रवर्तक' प्रेषित मुहम्मद (स.ए.) आहेत; परंतु प्रत्यक्षात इस्लाम हा १४०० वर्षांपेक्षा जुना धर्म आहे. पृथ्वीवरील मानवजातीचा इतिहास तितकाच जुना आहे आणि मुहम्मद (सल.) हे त्याचे संस्थापक नाहीत, तर त्याचे कॉलर आहेत. इस्लामचा इतिहास जाणून घेण्याचं खरं माध्यम म्हणजे इस्लामचा मूळ ग्रंथ 'कुराण' होय. कुराणात इस्लामच्या सुरुवातीचा उल्लेख पहिला पुरुष 'आदम' यानं केला आहे. इस्लामच्या अनुयायांसाठी, कुराणनं हजरत इब्राहिम (अलेही) साठी 'मुस्लिम' शब्द वापरला आहे, जो सुमारे चार हजार वर्षांपूर्वी एक महान पैगंबर (दूत) होता. हजारो वर्षांच्या इस्लामी इतिहासात आदम (अलेही) पासून ते मुहम्मद (स.) पर्यंत असंख्य प्रेषितांची नियुक्ती वेगवेगळ्या युगांमध्ये आणि वेगवेगळ्या राष्ट्रांमध्ये ईश्वराच्या संदेशासह करण्यात आली. त्यापैकी २६ जणांची नावं कुराणात नमूद आहेत आणि बाकीच्यांची नावं नाहीत. बोली आणि भाषांच्या विकासाचा इतिहास कुराणनं सांगितला नसल्यामुळं वेगवेगळ्या कालखंडात 'इस्लाम'ची नावे काय होती, हे माहीत नाही. इस्लामचा इतिहास आदिम असण्याचं वास्तव समजून घेण्यासाठी 'इस्लाम' समजून घेणं आवश्यक आहे. इस्लाम म्हणजे काय, तो कुराणच्या माध्यमातून काही विशिष्ट शैलींमध्ये आपल्यापर्यंत पोहोचतो.

इस्लामचा संदर्भ वैचारिक पातळीवर 'शुद्ध एकेश्वरवाद' आहे. इथं 'विशुद्ध' म्हणजे ईश्वराचं व्यक्तिमत्त्व, त्याचा अधिकार आणि सार्वभौमत्व, त्याचे अधिकार (जसे की उपासना व उपासना करण्याचा अधिकार इ.) इतर कोणीही सामायिक केलेला नाही. विश्वाचं हे महत्त्वाचे आणि महान सत्य; पण संपूर्ण विश्वाचं आणि अफाट सृष्टीचं हे मानवजातीच्या उत्पत्तीपासून हजारो वर्षांच्या इतिहासात अपरिवर्तनीय आणि शाश्वत आहे. इस्लाम शब्दाचा अर्थ शांती, संरक्षण आणि शरणागती असा आहे. अशा प्रकारे इस्लामी परिभाषेतील इस्लाम हे नाव म्हणजे मानवाचं ईश्वराला पूर्ण समर्पण आणि या शरणागतीतून व्यक्ती, समाज आणि मानवजातीला 'शांती आणि सुरक्षितता' प्राप्त होते. इस्लामची वास्तविकता, एकेश्वरवादाची वास्तविकता, मानवाकडून एकेश्वरवादाच्या मागण्या, मनुष्य आणि ईश्वर यांच्यातील अपेक्षित संबंध, या (मरणोत्तर) जीवनानंतरचं जीवन इत्यादीची वास्तविकता जाणून घेणं, शांत, यशस्वी आणि मुक्त जीवन जगणं समजून घेणं आवश्यक आहे. समस्या, विडंबन आणि शोकांतिका हे प्रत्येक युगात राहिले आहेत, म्हणून देवानं प्रत्येक युगात त्याचे दूत (दूत, पैगंबर, संदेशवाहक, पैगंबर) नियुक्त करण्याची तरतूद केली आहे. या प्रक्रियेचा इतिहास मानवजातीच्या संपूर्ण इतिहासात व्यापलेला आहे. 'धर्म' हा शब्द कुराणनं इस्लामसाठी 'दीन' या शब्दाद्वारे व्यक्त केला आहे. कुराण (४२:१३) मध्ये उद्धृत केलं आहे की, देवानं त्यांना दीन स्थापन करण्याचा आणि त्यात भेदभाव निर्माण न करण्याचा आदेश दिला.

या संदेशांमध्ये हजरत नोहाचाही उल्लेख आहे आणि हजरत नोहा (अलेही) हे मानवजातीच्या इतिहासाच्या सुरुवातीच्या काळातील पैगंबर आहेत. कुरआनच्या वरील श्लोक (४२:१३) वरून ही वस्तुस्थिती समोर येतं की 'दीन' (इस्लाम) मध्ये भेद, भेद, विभागणी, भेद इत्यादी करणं हे सत्यविरोधी आहे. मानवी स्वभाव पहिल्या दिवसापासून आजपर्यंत तसाच आहे. त्याच्या मूलभूत प्रवृत्तींमध्ये आणि त्याच्या मूलभूत आध्यात्मिक, नैतिक, भौतिक गरजांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. मानवाचा मूळ धर्मदेखील मानवजातीच्या संपूर्ण इतिहासात त्याच्या स्वभावानुसार आणि प्रवृत्तीनुसारच असला पाहिजे. इस्लामच्या मूलभूत संकल्पना, शिकवणी, आदेश, नियम हे सर्व माणसाच्या स्वभावाला आणि स्वभावाला अनुसरून आहेत.

हा मानवजातीचा आदिम आणि सनातन धर्म आहे. कुराणमध्ये कुठंही हजरत मुहम्मद (स.) यांना 'इस्लामचे जन्मदाता' म्हटलेलं नाही. कुराणमध्ये हजरत मुहम्मद (स.) यांची ओळख नबी (दैवी ज्ञान देणारे), रसूल (मानवजातीसाठी पाठवलेले), रहमतुल-लिल-अलामीन (सर्व जगासाठी आशीर्वाद आणि खरी करुणा, दया) अशी केली आहे.

सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी जवळजवळ संपूर्ण जग व्यापलेल्या युरोपीयन (विशेषतः ब्रिटीश) साम्राज्यानं इस्लाम धर्माचं एकूण वय १४०० वर्षे आहे, हा गैरसमज पसरवण्यात मोठी भूमिका बजावली. या प्रचाराचा भारतातील रहिवाशांमध्येही काही प्रमाणात परिणाम झाला आणि त्यांनीही 'मुहम्मद-इझम' म्हणून इस्लामचा स्वीकार केला.




भारतीय समाजजीवनाच्या प्राचीन इतिहासात अनेक महान व्यक्तिंनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. आपल्या योगदानाने त्यांनी भारत भारताच्या प्राचीन इतिहास परंपरेत अनेक महान व्यक्तिंनी समाजजीवनाला महत्त्वाचे वळण दिले आहे. अशा महान व्यक्तिंपैकी तथागत गौतम बुद्ध हे महत्त्वाचे आहेत. कर्मकांड याचा अतिरेक असलेल्या समाजाला लोक भाषेत समजावून नीतिमूल्यांची चौकट बळकट करण्यात गौतम बुद्धांनी आपले योगदान दिले.

हे योगदान देत असताना गौतम बुद्धांनी वेगवेगळ्या पद्धतीने समाजाला व्यक्तींना मार्गदर्शन केले. ज्याप्रमाणे एखादा चांगला शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांची पात्रता ओळखून त्यानुसार त्याला मार्गदर्शन देतो त्याच प्रमाणे गौतम बुद्धांचे बुद्धांनी देखील समोरील व्यक्तीची पार्श्वभूमी पात्रता पाहून उपदेश केला. उद्धटपणाने त्यांच्याशी बोलणाऱ्या एका शेतकऱ्याला त्यांनी सांगितले, भ्रांत झालेल्या माणसांची अंत:करणे हे माझे शेत, प्रज्ञा माझा नांगर, वीर्य हा बैल, धर्म हा दंड आणि श्रद्धा हे बीज आहे. चोहीकडे ज्ञानरूपी नांगर फिरवून अज्ञानरूपी कंटक काढून टाकतो व तिथे श्रद्धेचे बी पेरतो. या माझ्या शेतात कामाला जे फळ येते त्याला अमृतफल अथवा निर्वाण म्हणतात.

शेतीशी संबंधित गोष्टींच्या रूपकाने दिलेला उपदेश त्या शेतकऱ्याला पटला. उपदेश देण्याची ही एक पद्धत तर किसा गौतमी यांच्या प्रसंगात वेगळ्या पद्धतीने उपदेश दिला. किसा गौतमी यांचा मुलगा मरण पावल्यानंतर त्या सैरभैर झाल्या. ज्यावेळी अशाप्रकारे मृत्यूचे संकट आईवर कोसळते त्यावेळी केवळ शब्दांनी त्या आईची समजूत घालणे अशक्य हे गौतम बुद्धांच्या सहज लक्षात आले. त्यामुळे ज्या घरात मृत्यू झाला नाही अशा घरातून मूठभर मोहरी आणून दिल्यास तुझ्या मुलाला जिवंत करतो असे त्यांनी किसा गौतमीला सांगितले. पुत्रशोकाने वेडी झालेली ती आई घरोघर गेली. अर्थातच मृत्यू न झालेले एकही घर तिला आढळले नाही. त्यामुळे मोहरी ती आणू शकली नाही. परंतु सुरुवातीला आशा पालवून ज्यावेळी ती आई घरोघर जात होती तसा तसा जो वेळ गेला त्याने 'मृत्यू हे अटळ सत्य आहे' हे स्वीकारण्यासाठी तिची मानसिक तयारी झाली. त्यानंतरच गौतम बुद्धांनी तिला उपदेश केला आणि तो तिने ग्रहण केला. अशा विविध प्रकारे उपदेश करणारे गौतम बुद्ध हे चांगले लोक शिक्षक होते.

आपल्याया मार्गावर चालण्यासाठी नीतिमूल्यांची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन गौतम बुद्धांनी नीतिमूल्यांची चौकट आपल्या अनुयायांना आखून दिली. पंचशीलाच्या माध्यमातून आखलेली ही चौकट निश्चितच सदैव मार्गदर्शक आहे.

**१)पाणातिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामी**
**अर्थ : मी जीव हिंसेपासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करत आहे.**
**२)अदिन्नदाना वेरमणी सिक्खापदं समादियामी**
**अर्थ : मी चोरी करण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करत आहे.**
**३)कामेसुमिच्छाचारा वेरमणी सिक्खापदं समादियामी'**
**अर्थ : मी व्याभिचारापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करत आहे.**
**४)मुसावादा वेरमणी सिक्खापदं समादियामी**
**अर्थ : मी खोटे बोलण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करत आहे.**
**५)सुरा-मेरय-मज्ज पमादट्ठाना वेरमणी सिक्खापदं समादियामी**
**अर्थ :** मी मद्य, त्याचप्रमाणे मोहात पाडणाऱ्या इतर मादक वस्तूंच्या सेवनापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करत आहे.

दुर्दैवाने सध्या समाजात व्यसनांना प्रतिष्ठा लाभली आहे. व्यसनांच्यापाई व्यक्तिगत आयुष्याचे नुकसान तर होतेच परंतु समाजावरदेखील त्याचे विपरीत परिणाम होतात. दुर्दैवाने समाजातील व्यसनांचे प्रमाण वाढले आहे आणि अशा व्यसनांसाठी वाटेल तेवढा खर्च करण्याची तयारी समाजातील काही घटक दाखवतात. त्यामुळे सरकारदेखील सोयीस्करपणे या सगळ्या व्यसनांना चालना मिळेल यासाठी प्रयत्न करत राहते.

चित्रपट, नाटक, वेब सिरीज अशा करमणुकीच्या विविध साधनांतून व्यसनांची भलावण केलेली आढळते. हळूहळू समाजमनाला या पद्धतीने वळवण्यात या सगळ्यांचा मोठा वाटा आहे हे आपल्याला सहज समजू शकते. याचप्रमाणे पंचशीलातील अन्य अपेक्षांचा देखील विचार करता येईल.

श्रेष्ठ उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर साधनाची शुद्धता ही फार महत्त्वाची असते. तसेच समाज श्रेष्ठ होण्याचे उद्दिष्ट साध्य व्हायचे असेल तर व्यक्तिंच्या आचरणाची शुद्धता अतिशय आवश्यक आहे. यासंदर्भात तथागत गौतम बुद्ध यांचे विचार सर्वकाळासाठी मार्गदर्शक आहेत. समाजाने त्या पद्धतीने वाटचाल सुरू ठेवणे आवश्यक आहे.

# काही काळापासून शेकडो वेळा उडत्या तबकड्या दिसल्याची नोंद : पेंटागॉन

**वॉशिंग्टन :** मागील काही काळापासून शेकडो वेळा अंतरिक्षात उडत्या तबकड्या (यूएफओ) दिसल्याच्या घटनांची नोंद झाली आहे. मात्र, परग्रहावरील सजीवांबाबत (एलियन्स) कोणतीही ठोस घेण्यासाठी अमेरिकेने ऑल डोमेन नॉमली रीझोल्युशन ऑफिस हा विभाग जूनमध्ये स्थापन केला आहे. एक वर्षाच्या कालावधीपासून या कार्यालयाच्या वतीने हवाई दलाच्या वैमानिकांनी दिलेल्या माहितीनुसार मागोवा घेतला जात आहे. मात्र, त्यानंतर अनेक ठिकाणाहून उडत्या तबकड्यांविषयी माहिती मिळत असल्याचे रिझोल्यूशन ऑफिसचे संचालक सीन किर्कपॅट्रिक यांनी सांगितले.

एलियन्स खरोखर अस्तित्वात आहेत का, दिसून येणारे यूएफओ याची माहिती घेणे हे देखील या कार्यालयाचे काम आहे.

सध्याच्या काळात तर उडत्या तबकड्यांच्या पुढे जाऊन हायपरसॉनिक बॉम्बर, हायपरसॉनिक फायटर, ड्रोन अशी अनेक साधने अमेरिकेने आणि चीननेही मोठ्या



माहिती मिळाली नाही, असे अमेरिकेच्या संरक्षण मुख्यालयाच्या (पेंटागॉन) प्रमुख अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

केवळ आकाशातच नव्हे तर समुद्राच्या पाण्यात अथवा जमिनीवर असलेल्या, जमिनीवरून अथवा पाण्यातून आकाशात जाणाऱ्या किंवा येणाऱ्या कोणत्याही ओळखू न येणाऱ्या वस्तू दिसून आल्यास त्याची काटेकोरपणे नोंद अनेकदा अकारण भीतीचे वातावरण निर्माण होण्याच्या शक्यतेने काही ढोबळ घटनांची नोंद घेणे टाळले जाते. अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार सन २००४ ते २१ या काळात १४४ वेळा उडत्या तबकड्या दिसल्याची माहिती मिळाली. त्यापैकी ८० तबकड्यांची छबी विविध साधनांच्या माध्यमातून टिपण्यात आली आहे.

हे एलियनचेच आहेत का, याची माहिती घेणे एवढेच रिझोल्युशन ऑफिसचे काम नाही, तर उडत्या तबकड्या सदृश काही वस्तू चीन किंवा रशिया यांच्यासारख्या शत्रू राष्ट्रांनी पाठवल्या आहेत का, त्यांच्यामुळे अमेरिकेच्या लष्करी आस्थापनांना किंवा विमानांना धोका आहे का, प्रमाणात तैनात केली आहेत. या साधनांना अनावधानाने यूएफओ समजले जाऊ नये, याची काळजीही या कार्यालयाने घेणे अपेक्षित आहे.

# देशात प्रथमच साकारली बहुधर्मीय स्मशानभूमी

**हैदराबाद :** धार्मिक सौहार्दाचे प्रतीक ठरणारी बहुधर्मीय स्मशानभूमी हैदराबाद महानगर विकास प्राधिकरणाच्या पुढाकाराने साकारण्यात आली आहे. या सुसज्ज स्मशानभूमीचे लोकार्पण लवकरच करण्यात येणार आहे, अशी माहिती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

उप्पल येथील फतुल्लागुडा येथे साडे सहा एकर जागेवर ही स्मशानभूमी उभारण्यात आली आहे. या स्मशानभूमीत एकाच आवारात मात्र, स्वतंत्र जागांवर हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मांनुसार अंत्यसंस्कार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या स्मशानभूमीच्या उभारणीसाठी हैदराबाद महापालिकेने कचरा डेपो बंद करून जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेत बांधकामातील राडारोडा आणि डबर टाकून जमिनीचे सपाटीकरण करण्यात आले आहे. हे कामही महापालिकेच्या वतीने करून देण्यात आले.

तिन्ही धर्मीय स्मशानभूमीसाठी स्वतंत्र जागा देण्यात आली आहे. त्यामध्ये कार्यालय, शवागार, प्रार्थनागृह, सुरक्षा कक्ष, स्वच्छतागृह, वाहनतळ अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या स्मशानभूमीच्या एकूण बांधकामासाठी १३ कोटी २५ लाख रुपये खर्च करण्यात आले.




हिंदू स्मशानभूमीसाठी अडीच एकर जागा देण्यात आली आहे. या स्मशानभूमीची उभारणी पर्यावरणपूरक पद्धतीने करण्यात आली आहे. या ठिकाणी दोन आधुनिक विद्युतदाहिन्या उभारण्यात आल्या आहेत. या यंत्रणेसह इतर आवश्यक वीज पुरवठ्यासाठी १३० किलो वॉट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पही उभारण्यात आला आहे. दहाव्या दहाव्या दिवसाच्या विधीसाठी स्वतंत्र इमारतीची सुविधा देण्यात आली आहे.

मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मियांच्या अंत्यसंस्कारासाठी प्रत्येकी २ एकरांची पारंपारिक दफनभूमी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याची रचना त्रिस्तरीय असून प्रत्येक दफनभूमीत ५५० मृतदेहांचे दफन करता येणार आहे.

# कमीत कमी जागेत आरोग्यदायी लसूण पिकविण्याची युक्ती...

**मुंबई :** महानगरामध्ये दाट लोकवस्तीत राहताना कमीतकमी जागेत जगण्याची सवय करावी लागते. माणसांना वावरायलाच जागेची कमतरता असताना झाडे लावणे हे अशा लोकांसाठी स्वप्नवतच ठरते. मात्र, इच्छा येथे मार्ग ही म्हण एका सदनिकेत २३ वर्षांहून अधिक काळ घालवलेल्या मीलन कुमार यांनी खरी करून दाखवली आहे.

मी 'स्क्वेअर फूट फार्मिंग' या पद्धतीचा वापर करून कमीत कमी जागेत भाजीपाला आणि फुले पिकविने शक्य आहे. या पद्धतीनुसार ९ ु ९ फूट जागा ८१ तुकड्यांमध्ये विभागली जाते. प्रत्येक तुकड्यात एक रोप लावले जाते. ही शहरात राहून बागा फुलविण्यासाठी वापरली जाणारी पद्धत आहे, असे मीलन यांनी सांगितले.

छोट्या जागेत राहूनही उपलब्ध जागेत आणि साधनसंपत्तीत मीलन कुमार प्रयोग करीत राहिले. चार वर्षांपूर्वी ते त्यांच्या मूळ गावी डेहराडून येथे राहण्यासाठी गेले. त्या ठिकाणी त्यांनी लसूण पिकविण्यासाठी एक अभिनव मार्ग शोधला.

लसणाची पाने आणि बिया अशा दोन्हीचा वापर केला जातो. जर पाने वापरण्यासाठी लसणाची बाग तयार करायची असेल तर काही जुने प्लास्टिकचे डबे पुरेसे ठरतात. टोपलीचा वापर करून संपूर्ण लसणाची लागवड करता येऊ शकते, असे मीलन कुमार सांगतात.

मीलन कुमार दरवर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात कंटेनरमध्ये लसूण पेरतात. ८ ु ५ इंच आकाराच्या कंटेनरमध्ये १६० लसूण पाकळ्या हिरव्या लसूण पानांसाठी लावल्या जातात तर त्याच आकाराच्या टोपलीमध्ये १० पाकळ्या संपूर्ण लसूण पिकविण्यासाठी लावल्या जातात. लसूण पिकविण्याची प्रक्रिया मीलन कुमार टप्प्या टप्प्याने स्पष्ट करतात...

रुंद पृष्ठभाग असलेली एक जुनी प्लास्टिकची टोपली घ्या. टोपलीच्या प्रत्येक कोपऱ्यात जास्तीच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी छिद्र करा. त्या टोपलीत माती भरा. त्यामध्ये लसणाच्या पाकळ्या घाला. त्यामध्ये कमीतकमी ३ ते ५ इंच अंतर ठेवा. त्यामुळे त्यांना चांगल्या वाढीसाठी वाव मिळेल. जेणेकरून ते चांगले वाढू शकतील. त्यामध्ये एक दिवसाआड पाणी शिंपडा. एका महिन्याच्या आतच आपल्याला लसणाच्या रोपाचे कोंब बाहेर आलेले दिसून येतील लसणाची पूर्ण वाढ होण्यासाठी २ ते ३ महिन्याचा कालावधी लागतो. पाने पिवळी पडू लागली की खाली लसूण तयार झाले आहेत असे समजावे.

मोठ्या प्रमाणात हिरवे लसूण वापरण्याची योजना असेल तर त्यासाठी लसणाची स्वतंत्र लागवड करणे चांगले. कारण कोणत्याही झाडाची अनेक पाने एकाच वेळी तोडली तर ती झाडे मरतात किंवा निरोगी फळ देत नाहीत. पानांसाठी कमी जागेत लसूण वाढविण्याची पद्धत... किमान ५ सेंटीमीटर रुंदी असलेला प्लॅस्टिक कंटेनर घ्या. तापविलेल्या सुरीने त्याला लसणाच्या गड्डीपेक्षा थोड्या मोठा आकाराची छिद्र पाडा. कंटेनरमध्ये माती आणि शेणखताचे मिश्रण घाला. त्यात एक चमचा राख आणि कडुलिंबाच्या वाळलेल्या पानांची पूड घाला. लसणाच्या गड्डया घेऊन त्याच्या पाकळ्या जरा मोकळ्या करा. लसूण वरचा भाग वर ठेऊन प्रत्येक छिद्रातून मातीखाली सरकवा. स्प्रेचा वापर करून एक दिवसाआड त्यावर पाणी शिंपडा. एक महिन्याच्या आत लसणाची वापरण्याजोगी पाने तयार होतील. ही लागवड केलेली लसूण कित्येक महिने पुरतील एवढी पाने देणार आहेत. लसूण रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त असतो. पचनाशी संबंधित समस्यांवरही त्याचा चांगला उपयोग होतो. स्वयंपाकातील पदार्थांच्या चवी वाढविण्यासाठी तर लसणाचा सर्रास वापर केला जातो. त्यामुळे पदार्थांची चवही वाढते आणि चांगला सुगंधही येतो. लसणामध्ये असलेल्या अँटिऑक्सिडंटमुळे पेशींचे नुकसान भरून निघते आणि वृद्धत्व दूर ठेवण्यास मदत होते. अल्झायमर आणि स्मृतिभ्रंशाचा धोका लसणामुळे कमी होऊ शकतो. हिरव्या लसणात ऍलिसिन नावाचे अँटीऑक्सिडंट असते. त्यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होते. छाती आणि पोटातील जळजळ कमी करण्यासाठी मदत करते. सर्दी, खोकला आणि थंडीतापापासून बचाव करण्यासाठीही त्याचा उपयोग होतो. हे अँटिऑक्सिडंट प्रतिकारशक्ती वाढवण्यास सक्षम आहे. कोथिंबीर आणि पुदिना यांच्याबरोबर लसणाची पाने वापरून स्वादिष्ट हिरवी चटणी बनविता येते.






# सॅनिटरी नॅपकिन्स बनू शकतात कर्करोगाचे कारण

**पुणे :** मासिक पाळीचा रक्तस्राव शोषून घेण्यासाठी दीर्घकाळापासून सॅनिटरी नॅपकिन्सचा वापर जगभरातील महिला करीत आहेत. सॅनिटरी नॅपकिनला आता कप, पिरियड अंडरवेअर, पुनर्वापर करण्याजोगे नॅपकिन्स असे अनेक पर्याय उपलब्ध असले तरीही अजूनही बहुतेक महिला सॅनिटरी नॅपकिन्सच वापरत आहेत. मात्र, सॅनिटरी नॅपकिन्सच्या वापराने कर्करोग आणि अन्य अनेक प्रकारच्या विकारांना सामोरे जावे लागू शकते, असे संशोधनातून सिद्ध झाले आहे.

सॅनिटरी नॅपकिन्स तयार करताना त्यामध्ये अनेक प्रकारच्या रसायनांचा वापर केला जातो. सॅनिटरी नॅपकिन्सचा मऊपणा, लवचिकपणा आणि टिकाऊपणा वाढविण्यासाठी फ्थालेट नावाचे एक रसायन वापरले जाते. हे रसायन अत्यंत घातक असून ते वंध्यत्व, स्थूलपणा, दमा यासह स्तनांच्या कर्करोगाचे निमित्त ठरू शकते.

सॅनिटरी नॅपकिन्स स्वच्छ आणि मऊ करण्यासाठी त्यावर ब्लिचींगची प्रक्रिया करण्यात येते. या प्रक्रियेत अनेक घातक रसायने वापरली जातात. विशेषतः या प्रक्रियेत तयार होणाऱ्या डायॉक्सिन या अत्यंत विषारी व प्रदूषणकारी रसायनामुळे योनीमार्गात जळजळ, हार्मोन्स असंतुलन, कर्करोग आदी विकारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असते.

सॅनिटरी नॅपकिन्स बनविण्यासाठी कापसाचा वापर केला जातो. हा कापूस शेतात असताना त्यावर फवारलेली कीटकनाशके आणि जंतुनाशके त्यावर दीर्घकाळ टिकून राहतात. त्याच्या संपर्कामुळे वंध्यत्व आणि मधुमेहाचा धोका उद्भवतो. लीकप्रूफ सॅनिटरी नॅपकिन्सच्या तळाशी प्लॅस्टिकचा पातळ पडदा असतो. त्यामुळे हवेला रोखले जाते आणि बुरशी आणि विषाणू निर्मितीला पोषक वातावरण तयार होते. त्यामुळे महिलांच्या आरोग्याला धोका पोहोचू शकतो. सॅनिटरी नॅपकिन्सच्या वापराचे हे धोके लक्षात घेता महिलांनी कप अथवा पिरियड अंडरवेअरचा पर्याय निवडावा, असे आवाहन स्त्रीरोग तज्ज्ञांकडून केले जात आहे. त्यासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवती आणि महिलांना शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन कप उपलब्ध करून द्यावे आणि त्याच्या वापराबद्दल जनजागृती करावी, असे आवाहनही करण्यात येत आहे. तरीही अन्य पर्यायांचा वापर करणे सोईस्कर नसेल किंवा परवडणे शक्य नसेल तर दर चार तासांनी सॅनिटरी नॅपकिन्स बदलावे. त्याची सुरक्षित जागी विल्हेवाट लावावी, अशी सूचना करतानाच बंगळुरू येथील फॉर्टीस रुग्णालयाच्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. गायत्री कामत या सॅनिटरी नॅपकिन्सची विल्हेवाट लावण्याची प्रक्रियादेखील प्रदूषणकारी असल्याची जाणीव करून देतात.

# इष्टापत्तीतून उभा राहिला सेंद्रीय पदार्थांचा उद्योग

**त्रिवेंद्रम :** मानवी आयुष्यात आलेली संकटं कायम केवळ दु:खच देऊन जातात असे नाही तर काही जण त्या संकटापासून प्रेरणा घेऊन त्यातून काही नवीन विधायक कार्य उभे करतात. अशीच प्रेरणा देणारी कहाणी आहे केरळमधील फ्रांसी जोशिमोन या महिलेची!

फ्रांसी यांच्या वडलांना कर्करोग झाल्याचे सन २०१८ मध्ये निदर्शनास आले. उपचाराच्या काळात त्यांना सकस आणि रसायनमुक्त अन्न उपलब्ध व्हावे यासाठी त्याचा शोध घेण्यात आला. मात्र, ते सहजपणे उपलब्ध होऊ शकले नाही. काही महिन्यातच फ्रांसीच्या वडलांचे निधन झाले. या घटनेने फ्रांसीच्या आयुष्याची दिशाच बदलून टाकली.

सेंद्रीय अन्नधान्य, पौष्टीक आहार सर्वांना सहज उपलब्ध व्हावा यासाठी केवळ १२ वी उत्तीर्ण असलेल्या फ्रांसीने उत्पादन प्रकल्प उभारण्याचा चंग बांधला. घरीच मिनस फ्रेश फूड ही कंपनी स्थापन करून व्यवसायाला सुरुवात केली.

त्या काळात फणसाचे पौष्टीक आणि औषधी गुणधर्म या विषयाची सर्वत्र चर्चा होती. केरळमध्ये फणस मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. बाजरीही पिकवली जाते. त्यामुळे अनेक आहारतज्ज्ञ आणि केरळ कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रांसीच्या कंपनीने फणस आणि बाजरी याचा वापर करून इम्युनिटी बूस्टर आणि हेल्थ मिक्स ही उत्पादने विकसित केली. त्याची परिणामकारकता तपासण्यासाठी त्यांचे सामाजिक संस्थांच्या मदतीने जिल्हा आणि परिसरातील कर्करुग्णांना वाटप करण्यात आले. त्याचे परिणाम उत्साहवर्धक ठरले.

स्थानिक महिलांना कामावर घेऊन फ्रांसीने उत्पादन प्रकल्प सुरू केला. तिच्या अभियंता असलेल्या पतीने प्रक्रिया आणि पॅकींग यासाठी आवश्यक यंत्र तयार करून दिली. या प्रकल्पासाठी फ्रांसीच्या कुटुंबाने स्वत:चे ३० लाख रुपये भांडवल घातले आणि १५ लाख रुपये बँकेतून कर्ज घेतले.

या प्रकल्पाला आवश्यक कच्च्या मालाचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यांनी पिकवलेले फणस, केळी, बाजरी, तांदूळ याची खरेदी कंपनी चांगला भाव देऊन करते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ झाली आहे.

या उत्पादनांमध्ये ती टिकून राहण्यासाठी कोणत्याही रसायनांचा वापर केला जात नाही. त्यामुळे सुरुवातीच्या काळात ही उत्पादने कमी कालावधीत खराब होणे हे मोठे आव्हान होते. यावेळी पुन्हा केरळ कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञ मदतीला धावून आले. त्यांनी उत्पादन प्रक्रियेत काही सुधारणा सुचविल्या. उत्पादनांमधील बाष्प पूर्णपणे निघून जाईल यासाठी वळवण्याच्या प्रक्रियेत बदल सुचविले. त्याचा अवलंब केल्यानंतर हे पदार्थ तब्बल ६ महिने टिकून राहू शकत आहेत.

हेल्थ मिक्स आणि इम्युनिटी बूस्टरसारख्या उत्पादनांबरोबर फ्रांसीची कंपनी तांदुळाची पिठी आणि केळे वेफर्स यांचेही उत्पादन आणि विक्री करते. प्रामुख्याने राज्यभरातील दुकाने, सुपर मार्केट आणि मॉल्स या माध्यमातून या उत्पादनांची विक्री केली जाते. आता अरब अमिरतीत या उत्पादनांची निर्यात सुरू झाली असून त्याची मागणी वाढत असल्याचे फ्रांसी सांगते. पुढील काळात उत्पादनांचे प्रकार, प्रमाण आणि बाजारपेठ यांची व्याप्ती वाढविणार असल्याचेही तिने नमूद केले.



# छंदातून साकारले लहानपणचे स्वप्न



भटिंडा: पंजाबमधील एका शेतकऱ्याने आपल्या लहानपणी पक्षांप्रमाणे आकाशात उडण्याचे स्वप्न रंगविले होते. शेती व्यवसायात स्थिर स्थावर झाल्यावर विमानांची प्रतिकृती तयार करण्याचा छंद जोपासत हे स्वप्न साकारण्याची कामगिरी केली आहे येथील एक शेतकरी यादविंदर सिंग खोखर यांनी!

खोखर हे भटिंडा जिल्ह्यातील सिरेवाला या गावात लहानाचे मोठे झाले. त्यांनी विज्ञानाची पदवी आणि संगणकशास्त्राची पदविका घेऊनही शेती करण्याचा पर्याय निवडला. कुटुंबातील एका विवाहासाठी सन २००७ मध्ये त्यांना ब्रिटनला जाण्याची संधी मिळाली. तिथे त्यांनी फ्लाईंग क्लबमध्ये वेगवेगळ्या विमानांच्या प्रतिकृती बघितल्या. त्यातून त्यांच्या लहानपणीच्या स्वप्नाला उजाळा मिळाला.

तिथून परत येताना खोखरा यांनी विमानाच्या दोन छोट्या प्रतिकृती बरोबर आणल्या. तेव्हापासून त्यांच्या मनात आपणही अशा प्रतिकृती तयार कराव्या, अशी उर्मी दाटून आली. त्यासाठी त्यांनी इंटरनेटवर शोध घेऊन एरोमॉडेलिंग या विषयाची माहिती घेतली. याच शोधात त्यांना दिल्ली येथे लष्कर आणि हवाई दलातील निवृत्त अधिकारी विमानांच्या प्रतिकृती बनविण्याचे प्रशिक्षण देत असल्याची माहिती मिळाली. खोखर यांनी हे प्रशिक्षण घेतले आणि स्वतः प्रतिकृती बनविण्यास सुरुवात केली.

खोखर यांनी आपल्या शेतात १ एकर जागेवर धावपट्टी उभारली. विमानांच्या प्रतिकृती बनविण्यासाठी प्रयोगशाळा आणि कार्यशाळाही उभारली. अधिक घनता असलेल्या थर्माकोलपासून विमानाच्या मोठ्या आकारातील प्रतिकृती ते बनवतात. ही विमाने धावपट्टीवरून आभाळात उड्डाण करतात आणि खऱ्या विमानाप्रमाणे जमिनीवर उतरतात. ही विमाने दूरवरून नियंत्रित करता येतात. खोखर यांनी नुकतीच सी १३० हर्क्युलस या विमानाची प्रतिकृती बनवली आहे. देशात आतापर्यंत बनवली गेलेली ही आकाराने सर्वात मोठी प्रतिकृती आहे. गेल्या वर्षी इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने या विक्रमाची नोंद घेतली आहेत. या शिवाय त्यांनी सुखोई या लढाऊ विमानासह अनेक विमानांच्या प्रतिकृती तयार केल्या आहेत. सध्या ते अँटोनोव या विमानाची प्रतिकृती बनवित आहेत. आपले एरोमॉडेलिंगचे काम नागरी उड्डयन महासंचालनालय आणि अन्य संबंधित शासकीय नियमांप्रमाणे चालते. या प्रतिकृती नियमाने निश्चित केलेल्या उंचीवरच उड्डाण करतात, असे खोखर यांनी स्पष्ट केले.

चंदिगढ विद्यापीठ, महाराजा रणजीतसिंह तंत्र विद्यापीठ आणि भटिंडा व जीएनए विद्यापीठ यातील विद्यार्थ्यांना खोखर एरो मॉडेलिंगचे प्रशिक्षण देतात. एरोनॉटिक्सचे तंत्र आणि तत्व शिकविण्यासाठी विमानांच्या प्रतिकृती खूप उपयुक्त ठरतात, असा त्यांचा दावा आहे. या शिवाय आपल्या फार्महाऊसवर ते विद्यार्थ्यांसाठी एरोमॉडेलिंगच्या कार्यशाळा आयोजित करतात. त्यामध्ये विमानांची बांधणी आणि विविध भागांची कार्यपद्धती याबाबत मार्गदर्शन केले जाते.

खोखर यांच्या या अनोख्या आणि उपयुक्त छंदाची दखल घेऊन त्यांना अनेक सन्मान प्रदान करण्यात आले आहेत. विशेषत: अनेक विद्यापीठे आणि सैन्यदलाच्या विविध रेजिमेंट यांनी आपला गौरव केल्याचे ते नमूद करतात. आपल्या पित्यापासून प्रेरणा घेऊन त्यांच्या धाकट्या मुलाने एरोनॉटिक्स विषयात अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली आहे.

# दकुशा गुलाबोच्या 'सपेरा नृत्या'ने जगभरात उंचावली भारताची मान



जयपूर: दोन वेळच्या खाण्याची भ्रांत असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या गुलाबो हिने आपल्या स्वतः विकसित केलेल्या सपेरा नृत्यप्रकाराने जगभरात लोकप्रियता मिळवली असून त्याद्वारे जगात देशाची मान अभिमानाने उंचावली आहे. आज जगभरातले हजारो शिष्य तिच्या या अनोख्या नृत्यप्रकाराचे प्रशिक्षण घेत आहेत.

गुलाबोचा जन्म कालबलिया समाजातील एका गारुडी कुटुंबात सन १९७३ मध्ये झाला. कुटुंबातील सातवी मुलगी असल्याने अर्थातच ती नकुशी होती. त्यामुळे कुटुंबातीलच कोणीतरी तिला राजस्थानच्या तापत्या वाळूत गाडून टाकले. मात्र, माता-पित्याने शोध घेऊन सात तासानंतर तिला बाहेर काढले तरीही मरणाशी झुंज देत ती जिवंतच होती.

तिच्या जगण्याला समाजाचा, समाजाच्या पंचायतीचा प्रखर विरोध होता. तिला जिवंत ठेवल्याबद्दल तिच्या कुटुंबाला समाजाबाहेर काढण्यात आले. वाळीत टाकले तरीही ती जिवंत रहावी यासाठी तिच्या पित्याने समाजाशी अविरत संघर्ष केला. या संघर्षातूनच गुलाबोमधील जगद्विख्यात नृत्यांगना जन्माला आली. गुलाबोचे खरे नाव धन्वंतरी होते. मात्र, ती लहानपणापासून लखख गोऱ्या रंगाची. तिचे गाल गुलाबा एवढेच गुलाबी. त्यामुळे तिच्या वडिलांनी तिचे नाव गुलाबो असे ठेवले.

तिचे वडील गावोगावी सापांचे खेळ करत फिरायचे. नकुशा गुलाबोवर कोणाची वाईट नजर नको म्हणून काही महिन्यांची असल्यापासून तिला आपल्याबरोबर घेऊन जायचे. त्या नकळत्या वयातच तिला पुंगीच्या सुरांची आणि सापांच्या सळसळत्या नृत्याची भुरळ पडली. पुंगीच्या सुरावटीवर ती सापासारखी डोलायची, सापांसारख्या सळसळत्या हालचाली करत लचकायची. मुरकायची. यातूनच तिने कोणतेही औपचारिक प्रशिक्षण न घेता स्वत:ची सृजनशीलता आणि निरीक्षण शक्ती यातून एक नवीन नृत्यप्रकार जन्माला घातला. तो पुढे सपेरा किंवा कालबलिया नृत्य म्हणून प्रसिद्ध झाला.



अजमेरजवळच्या पुष्कर मेळ्यामध्ये नृत्य सादर करणाऱ्या गुलाबोला राजस्थान पर्यटन विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहिले. तिच्या अनोख्या नृत्याचे त्यांना कौतुक वाटले. त्यांनी तिला जयपूर येथे बोलावून घेतले. विविध ठिकाणी कार्यक्रम करण्यासाठी तिला मदत केली. याच दरम्यान सन १९८५ मध्ये तिच्या आयुष्याला कलाटणी देणारी संधी तिच्यासमोर आली. भारत सरकार अमेरिकेतील रसिकांना भारतीय नृत्यप्रकार माहिती व्हावे आणि भारतीय कलाकारांना आंतरराष्ट्रीय ओळख मिळावी यासाठी प्रयत्न करीत होते. त्यानुसार गुलाबोला वॉशिंग्टन येथे नृत्य सादर करण्याची संधी मिळाली. त्यामुळे तिला देश विदेशात ओळख मिळाली. त्यानंतर गुलाबोला केवळ भारतातच नव्हे तर विदेशातही आपल्या नृत्याचे कार्यक्रम करण्यासाठी बोलावले जाऊ लागले. त्यातून तिला आर्थिक आधार मिळत असला तरी पुरेसे स्थैर्य मिळाले नव्हते. कार्यक्रमासाठी ती ज्या शहरात जायची तिथे हॉटेलमध्ये राहण्यासाठी पुरेसे पैसे नसायचे. रस्त्याच्या बाजूला तंबू ठोकून ती राहायची. कालांतराने तिच्या नृत्यसाधनेला महाराणी गायत्रीदेवी यांच्याकडून समर्थ आधार मिळाला.

गुलाबोच्या नृत्याला कलासक्त फ्रेंच रसिकांची मोठी दाद मिळाली. फ्रान्समध्ये तिला शेकडो शिष्य मिळाले. तिच्या नृत्याचे अनेक अल्बम काढण्यात आले. तिच्यावर अनेक वृत्तमालिका प्रसिद्ध झाल्या. तिची यशोगाथा मांडणारे पुस्तकही प्रकाशित झाले. विशेष म्हणजे फ्रान्समधील एका रस्त्याला गुलाबोचे नाव देण्यात आले आहे. आज गुलाबोचे अमेरिका, कॅनडा, जपान, चिली आणि फ्रान्स येथे अनेक शिष्य तिच्या नृत्यशैलीचे प्रशिक्षण घेत आहेत. डेन्मार्क येथे आणि पुष्कर येथे तिने कालबलिया नृत्यशाला सुरू केल्या आहेत.

गुलाबो ही आता हजारो तरुणींचे प्रेरणास्थान बनली आहे. आपल्याला परिस्थितीमुळे शिक्षण घेता आले नाही. मात्र, पुढच्या पिढीतील, विशेषत: कालबलिया



समाजातील मुली औपचारिक शिक्षणापासून वंचित राहू नयेत, याकडे तिचा कटाक्ष असतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोककलावंत सन्मानाने जगावे यासाठी ती प्रयत्न करीत आहे. भारतीय लोककला जिवंत राहिली पाहिजे. वृद्धिंगत झाली पाहिजे. पुढील पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे यासाठीही तिची धडपड सुरू आहे.


# नाटक करणे ही माझी पॅशन : प्रशांत दामले

नाटक करणे हीच माझी 'पॅशन' आहे. नाटकाचा प्रयोग यशस्वी होणे हे नाटकासाठी झटणाऱ्या सर्वांच्या कामाचे ते फलित असते. म्हणूनच साडेबारा हजार प्रयोग हे चांगल्या 'टिमवर्क'चे उत्तम उदाहरण आहे; असे ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांनी सांगितले.

अभिनेते प्रशांत दामले यांनी नाट्यक्षेत्रात १२ हजार ५०० प्रयोग करण्याचा विक्रम नुकताच प्रस्थापित केल्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

आत्तापर्यंत माझी ३२ नाटके झाली असून ते केवळ टिमवर्क'मुळेच शक्य झाले आहे. नाटकाच्या प्रत्येक प्रयोगामध्ये नावीन्य असते. मराठी रंगभूमीने मला भरभरुन दिले आहे. जास्त काम केले, तर इथेही जास्त पैसे मिळतात. लेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ यांची भट्टी जमली आहे. त्यामुळे त्या बाबतीत लक्ष घालण्याची कधी गरज भासली नाही,असे दामले यांनी स्पष्ट केले.

दर्जेदार संहिता लेखन हा नाटकाचा पाया असतो. परंतु, अचानक उठलो आणि नाट्यलेखन करु लागलो, असे कधी होत नाही. मराठीमध्ये सध्या ४ ते ५ लेखक चांगल्या ताकदीचे आहेत. लेखकाने चांगले नाटक लिहीले, तर त्यावर दिग्दर्शक आणि कलाकारांना संस्कार करतात येतात. व्यावसायिक नाटक लिहीणे साधी गोष्ट नाही. सगळ्या गोष्टींचा विचार व्यावसायिक नाटक लिहीणाऱ्याला करावा लागतो, याची जाणीव दामले यांनी करून दिली.



मराठी नाट्यसृष्टीत सध्या उमेश कामत व संकर्षण कऱ्हाडे हे दोन कलाकार सच्चे आहेत. त्यांनी मनावर घेतले, तर दोघेही वेगळ्या उंचीवर जातील. नाटकात 'गुड रिऍक्टर इज गुड ऍक्टर' असे मी समजतो. अनेक लोकांनी एकत्र येऊन केलेल्या नाटकात चुका दिसत नाहीत, नाटकही लोकांना आवडते.'' असे दामले म्हणाले.

हृदयविकाराचा आजारानंतर मी तब्येतीची काळजी घ्यायला लागलो. मी कुठल्याही वादात दिसत नाही, कारण मी स्वतः आपल्या बोलण्याबाबत कटाक्षाने तारतम्य बाळगतो. चांगली झोप व निरोगी आरोग्यासाठी सहा महिन्यातून एकदा शरीरशुद्धीचा प्रयोग करतो. विशेषतः निर्माता म्हणून माझ्यावर मोठी जबाबदारी असते. तब्बल ५० लोकांचे कुटुंबाचे रेशन उपलब्ध होईल, तसे काम करावे लागते. कोरोना कालावधीतही हिच जबाबदारी पार पाडली, असेही त्यांनी सांगितले. बालगंधर्व नाट्यगृह पाडण्यापुर्वी ते काम मुदतीत पूर्ण करण्याची लेखी हमी प्रशासनाने द्यावी.'' अशी अपेक्षा दामले यांनी व्यक्त केली.

# केशराच्या इनडोअर उत्पादनाचे प्रयत्न सुरू



**श्रीनगर:** हवामानबदलामुळे काश्मीरमधील केशर उत्पादनात घट होत आहे. या समस्येवर मात करण्यासाठी उत्पादनाच्या नव्या पद्धती विकसित करण्याचे प्रयत्न कृषितज्ज्ञ करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून केशराचे इनडोअर उत्पादन घेण्याची पद्धती विकसित करण्यात आली आहे.

केशराचे इनडोअर उत्पादन घेण्याचे प्रयत्न प्रयोगशाळेत सफल ठरले आहेत. आता प्रत्यक्ष शेतकऱ्यांना त्याचा किती फायदा होऊ शकतो, याचा अभ्यास करण्यासाठी १२ पारंपरिक केशर उत्पादकांना आवश्यक सामुग्री आणि प्रशिक्षण देण्यात आले आहे.

हवामानबदलामुळे मागील काही वर्षांपासून केशर उत्पादनात घट होत आहे. इनडोअर केशर उत्पादन करण्याची पद्धत यशस्वी ठरल्यास उत्पादनात मोठी वाढ होऊ शकेल, असा विश्वास काश्मीर कृषी विद्यापीठाचे कुलगुरू नाझिर अहमद गणाई यांनी व्यक्त केला. घटलेले केशर उत्पादन पूर्वस्थितीत आणण्यासाठी इनडोअर वर्टिकल फार्मिंगचे तंत्र विकसित करण्यात आले आहे, असेही ते म्हणाले. काश्मिरची अर्थव्यवस्था पर्यटन आणि कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. हवामानबदलामुळे तापमानात होणारी वाढ आणि अनियमित पर्जन्यमान यामुळे कृषी उत्पादनात घट होत आहे. त्यामुळे खोऱ्यातील शेतकरी चिंताग्रस्त आहेत. त्याचप्रमाणे जमिनीवरील बर्फ वितळण्याचे वेळापत्रक बिघडल्याने शेतीचे वेळापत्रक बिघडले आहे. काश्मीर खोऱ्यातील अशांतता, फुटीरवादी कारवाया, त्यामुळे वारंवार संचारबंदी आणि निर्बंध याचाही कृषी उत्पादन आणि निर्यात यावर विपरीत परिणाम होत आहे.

# नेपाळमध्ये श्वानांचाही केला जातो असाही सन्मान



काठमांडू: प्राचीन भारतीय परंपरेत प्राण्यांना विशेष स्थान आहे. माणसाचे जगणे सुलभ करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या प्राण्यांसह प्रसंगी माणसाच्या जीवावर उठणाऱ्या प्राण्यांचीही पूजा करण्याची परंपरा भारतात आहे. मानवाचा सर्वात जवळचा मित्र आणि विश्वासू साथीदार असलेल्या श्वानांना मात्र पूजेचा मान मिळत नाही. शेजारच्या नेपाळमध्ये मात्र त्यासाठी विशेष सण साजरा केला जातो.

भारतीय परंपरेत आणि वास्तवातही श्वानाला देवाचा नाही तरी जवळच्या मित्राचा दर्जा दिला जातो. पुराणकथांमध्ये मानव आणि श्वान यांच्या सहजीवनाचे अनेक दाखले देण्यात आले आहेत. भगवान शंकराचे उग्र रूप असलेल्या भैरवाचे वाहन श्वान आहे. मृत्यू आणि न्यायाची देवता असलेल्या यमाचे द्वारपाल दोन श्वान असल्याचे दाखले आहेत. पांडव स्वर्गारोहण करण्यास निघाले असता त्यांना साथ देणारा एक श्वान आणि धर्मराज युधिष्ठिर एवढे दोघेच स्वर्गाच्या दारात पोहोचले. श्वानाला प्रवेश दिला नाही तर मीही स्वर्गात येणार नाही, असे युधिष्ठिराने सांगितले. अशा अनेक कथा पुराणात आहेत.

वर्तमानातही रुग्णांची सकारात्मकता वाढविण्यापासून ते स्फोटके आणि अमली पदार्थ शोधण्यापर्यंतची कामे करून श्वान मानवाला समर्थ साथ देत आहे. श्वानांना आगामी धोक्याचा, कदाचित मृत्यूचाही लवकर सुगावा लागतो आणि तो मानवावरचे संकट दूर करण्यासाठी प्रसंगी प्राण देण्यास तयार असतात, अशी मान्यता आहे आणि त्यात तथ्यही आहे.

या सगळ्यांबद्दल कृतज्ञता आणि आदरभाव व्यक्त करण्यासाठी नेपाळमध्ये दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी, नरक चतुर्दशीच्या दिवशी श्वानांचे पूजन केले जाते. या सणाला कुकुर तिहार असे नाव आहे. या दिवशी त्यांच्या कपाळावर कुंकुम तिलक केला जातो. गळ्यात फुलांच्या माळा, हार घातले जातात. ओवाळले जाते. दूध, अंडी आणि त्यांच्या आवडत्या पदार्थांचा नेवैद्य दाखविला जातो. विशेष म्हणजे यामध्ये पाळीव आणि भटके श्वान असा भेदभाव केला जात नाही. रस्त्यावर भटकणाऱ्या श्वानांचीही मनोभावे पूजा केली जाते. या निमित्ताने नेपाळमध्ये आधुनिक काळानुसार श्वानांशी संबंधित विविध उपक्रम आयोजित केले जातात. भटक्या श्वानांचे पूजन करण्याबरोबरच त्यांची संख्या मर्यादित ठेवण्याचे महत्त्व आणि त्यात सर्वसामान्य नागरिकांची भूमिका, याबाबत जनजागृती करण्यात येते. प्रशिक्षित श्वानांच्या विविध प्रकारच्या स्पर्धाही आयोजित करण्यात येतात. नेपाळच्या या स्तुत्य परंपरेचा मेक्सिकोनेही सन २०१६ पासून स्वीकार केला आहे. त्यांच्या क्रांती चौक या महत्त्वाच्या ठिकाणी नागरीक एकत्र येऊन सामूहिक रीतीने श्वानपूजा करतात. भारतातही हिमालयाच्या पर्वतीय भागात काही ठिकाणी कुकुर तिहारची परंपरा पाळली जाते.



# अप्रत्यक्ष धूम्रपानामुळे त्वचारोग होण्याचीही भीती

**कॅलिफोर्निया :** प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष धुम्रपानाच्या धोक्यांबाबत जगभरात मोठ्या प्रमाणावर संशोधन करण्यात आले आहे. हे संशोधन प्रामुख्याने श्वसन आणि फुफ्फुस यावर आहे. मात्र, अप्रत्यक्ष धूम्रपानामुळे त्वचारोग होण्याची भीती असल्याचेही नव्या संशोधनात आढळून आले आहे.

कॅलिफोर्निया विद्यापीठात करण्यात आलेल्या या संशोधनाचे निष्कर्ष ई बायोमेडिसीनमध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. हे संशोधन प्राथमिक स्वरूपाचे असून अधिक सखोल संशोधन आवश्यक असल्याचेही शोधनिबंधात नमूद केले आहे.

या संशोधनासाठी धूम्रपान न करणाऱ्या १० - १० निरोगी व्यक्तींचे गट करण्यात आले. त्यांना दिवसातील काही काळ तंबाखूच्या धुरातून निघणारे धूलिकण चिकटलेले कपडे घालण्यास देण्यात आले. त्यानंतर त्याचे परिणाम तपासण्यासाठी त्यांच्या रक्ताची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये त्यांच्या शरीरात सामान्य त्वचारोग आणि सोरायसिस सारख्या गंभीर त्वचारोगाला कारणीभूत ठरू शकणारे बदल घडून आल्याचे आढळले. हे बदल प्रयोगानंतर सुमारे २१ तास कायम होते, असेही संशोधकांना दिसून आले.

# आता अंत्यसंस्कारही करत आहे 'सुखांत' स्टार्ट अप



**मुंबई :** सध्याच्या व्यावसायिकतेच्या काळात कशाकशाचा व्यवसाय केला जाईल हे सांगता येत नाही. कुटुंबातील सदस्यांच्या मृत्यूनंतर शोकाकुल कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी सुखांत या स्टार्ट अपने अंत्ययात्रा ते अंत्यसंस्कार अशी सर्व सेवा व्यावसायिक पद्धतीने देण्यास सुरुवात केली आहे. या सेवेला वाढता प्रतिसाद मिळत आहे.

सध्याच्या काळात विभक्त कुटुंबांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. तसेच तरुण मुले परदेशात आणि त्यांचे आई, वडील भारतात, अशी कुटुंबही मोठ्या प्रमाणात आहेत.

मुंबईसारख्या महानगरात वर्षानुवर्ष शेजारी राहणाऱ्या लोकांचाही एकमेकांशी संपर्क नसतो. अशावेळी एकाकी लोकांना ही सेवा खूपच उपयुक्त ठरत आहे.

एखाद्या व्यक्तीचा एकाकी मृत्यू झाला अथवा कुटुंबीयांना अंत्यसंस्कार पार पाडण्याची धावपळ करणे शक्य नसेल तर ते सर्व सोपस्कार 'सुखांत' पार पाडते. पार्थिव स्मशानात नेण्यासाठी शववाहिनी उपलब्ध करून देणे, कुटुंबीयांची इच्छा असल्यास अंत्ययात्रा काढणे, मृताच्या परंपरेनुसार धार्मिक विधी करून अंत्यसंस्कार करणे, महापालिकेकडून मृत्यू प्रमाणपत्र काढून देणे या सर्व सेवा सुखांत कडून दिल्या जातात. अर्थात त्यासाठी भरभक्कम पैसेही मोजावे लागतात.

आता अंत्यसंस्कारही भाडोत्री माणसांकडून करून घ्यायचे का, असा सवाल करून काही वेळा या सेवेचा उपहास किंवा अवहेलनाही केली जाते. मात्र, बदलती कुटुंबव्यवस्था आणि समाजव्यवस्था विचारात घेता अशा सेवांची गरज वाढत जाणार आहे हे निश्चित!




## बरोबर एक वर्षांनी प्रदर्शित होणार 'सॅम बहादूर'

**मुंबई :** भारताच्या तिन्ही सैन्यदलांचे पहिले प्रमुख फिल्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांचा चरित्रपट असलेला सॅम बहादूर हा चित्रपट बरोबर एक वर्षानंतर १ डिसेंबर २०२३ रोजी देशभर प्रदर्शित करण्यात येईल, असे निर्मात्यांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

मेघना गुलजार या चित्रपटाचे दिग्दर्शन करीत असून अभिनेता विकी कौशल मुख्य भूमिकेत दिसणार आहे. सॅम बहादूर यांच्या पत्नी सिल्लोच्या भूमिकेत सान्या मल्होत्रा, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत फातिमा सना शेख दिसणार आहेत.

या चित्रपटाचे पहिले पोस्टर यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामध्ये विकी हुबेहूब सॅम बहादूर यांच्या सारखा दिसत असल्याने चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. नुकताच या चित्रपटाचा टिझर प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामध्ये विकीचा भूमिकेला अनुरूप रुबाबदार वावर प्रेक्षकांची वाह वा मिळवत आहे. समाजमाध्यमातून हा व्हिडिओ व्हायरल होत आहे. फिल्ड मार्शल सॅम माणेकशॉ हे सैन्यदलांचे लाडके नायक आणि देशभक्त होते. मी पंजाबशी संबंधित असलेल्या आई वडिलांकडून त्यांच्याबद्दल खूप ऐकले आहे. आजही त्यांचे नाव आदराने घेतले जाते. अशी व्यक्तिरेखा साकारण्याची संधी मिळणे हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे, असे विकी याने सांगितले.

लष्करी कारकीर्दीत ५ युद्धांमध्ये सैन्याचे नेतृत्व केले. त्यापैकी सन १९७१ चे भारत पाकिस्तान युद्ध ऐतिहासिक म्हणावे लागेल. या युद्धात भारताने पाकिस्तानवर मोठा विजय मिळवला. सॅम बहादूर यांच्या प्रेरणादायी लष्करी कारकीर्दीचा पट या चित्रपटातून मांडण्यात येणार आहे.

## संगीताच्या तालावर थिरकतात उंदरांचेही पाय

**टोकियो :** माणसाप्रमाणे प्राण्यांमध्येही संगीताची, तालाची जाण असते हे उंदरांवर केलेल्या एका प्रयोगातून निदर्शनास आले आहे. या प्रयोगात उंदरांनी त्यांना ऐकवलेल्या संगीताला तालबद्ध शारीरिक हालचाली करून प्रतिसाद दिला.

टोकियो विद्यापीठातील संशोधकांनी २० माणसे आणि १० उंदीर यांच्या शारीरिक हालचाली टिपणारे सेन्सर्स त्यांच्या डोक्यावर बसवले. या माणसांना आणि उंदरांनाही वेगवेगळ्या ताल आणि लयीतील संगीत आणि प्रति मिनिट १२० ते १५० बीटसची गाणी तीन दिवस ऐकवण्यात आली. त्यावेळी माणसांप्रमाणेच उंदरांचे पायही त्या लय आणि ताल याच्या ठेक्यावर थिरकले. प्रशिक्षण न दिलेले प्राणीही संगीताला अनुरूप तालबद्ध प्रतिसाद देतात हे सिद्ध करणारा हा जगातील पहिलाच प्रयोग असल्याचा दावा प्रा. हिरोकाजु ताकाहाशी यांनी केला आहे.

आवाज कानावर पडल्याने वेदनानिवारण होत असल्याचे यापूर्वी उंदरांवर केलेल्या प्रयोगातून सिद्ध झाले आहे. हा ध्वनी केवळ संगीतबद्ध असला पाहिजे असे नाही तर केवळ गोंगाटाच्या आवाजानेही अपेक्षित परिणाम साधला जात असल्याचे दिसून आले आहे.

ध्वनी कानावर पडल्याने केवळ वेदनेची जाणीव नष्ट होते असे नाही तर प्रत्यक्ष वेदना नष्ट होतात. संगीतामुळे मनोवृत्ती उल्हसित होतात आणि शारीरिक आरामही मिळू शकतो, असे पीअर रिव्ह्यू सायन्स या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधात नमूद करण्यात आले आहे.



## हवेतून बाष्प शोषून पिण्याचे पाणी पुरवणारी यंत्रणा विकसित

इस्राएल हा पाण्याचे कायमस्वरूपी दुर्भिक्ष असलेला देश आहे. मात्र, पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी तिथल्या एका कंपनीने मोठे वॉटर जनरेटर आणि छोटी यंत्र विकसित केली आहेत. हवेतून शोषलेले बाष्प वापरून त्यापासून या यंत्राने पिण्याचे शुद्ध पाणी तयार केले जाते.

वॉटरजेन या कंपनीने विकसित केलेले वॉटर जनरेटर मोठ्या औद्योगिक किंवा निवासी संकुलात वापरले जातात तर छोटी यंत्र कारमध्ये अथवा लहान कार्यालयात, दुकानात वापरले जातात. ही यंत्रणा आता भारतात देखील उपलब्ध झाली असून त्याला मोठ्या प्रमाणात मागणी वाढत असल्याचे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले.

ही यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत होण्यासाठी हवेमध्ये २० टक्के आर्द्रता असणे आवश्यक आहे. वॉटर जनरेटर २४ तासात ८०० ते ९०० लिटर पाणी तयार करू शकतो तर छोट्या यंत्रातून २४ तासात ३० लिटर पाणी तयार होते. या पाण्याचा उत्पादन खर्च साधारणपणे ५० ते ६० पैसे प्रति लिटर एवढा आहे.

हवेपासून पाणी तयार करणारे छोटे यंत्र कारच्या डिकीत बसवण्यात येते तर पाण्याचा नळ गिअर बॉक्सजवळ बसविण्यात येतो. त्यामुळे कारमधील प्रवाशांना शुद्ध पाण्याचा सतत पुरवठा केला जातो. आता वॉटरजेन कंपनी विविध कार उत्पादक कंपन्यांना संपर्क करत असून या गाड्यांमध्ये पाण्याची यंत्रणा बसविण्याचा कंपनीचा मानस आहे.

वॉटर जनरेटर इमारतीच्या गच्चीवर बसवून नळाद्वारे इमारतीमध्ये पाणी पुरवठा केला जातो. भारतील जयापुरिया ग्रुप या कंपनीशी वॉटरजेन कंपनीने सहकार्य करणार केला असून भारतात या ग्रुपकडून ही यंत्रणा पुरवली जात आहे.

## शत्रूच्या ड्रोनचा पाडाव करतात कुत्रे आणि गरुड





**डेहराडून :** पाकिस्तानातून भारतीय हद्दीत टेहळणी करण्यासाठी आणि शस्त्रास्त्र, अमली पदार्थांच्या तस्करीसाठी ड्रोनचा वाढता वापर वाढत असतानाच त्यांचा प्रभावीपणे पाडाव करण्यासाठी लष्कराने कुत्रे आणि गरुड यांना प्रशिक्षित केले आहे. कुत्रे ड्रोनचा ठावठिकाणा शोधून काढतात तर गरुड आकाशात झेप घेऊन त्यांना जमिनीवर घेऊन येतात.

भारतीय आणि अमेरिकन लष्कराचा संयुक्त युद्धसराव भारत आणि चीमधील सीमारेषेपासून १०० किलोमीटर अंतरावर पर्वतीय प्रदेशात सुरू आहे. या सरावादरम्यान भारतीय लष्कराने प्रशिक्षित केलेल्या श्वान आणि गरुडांकडून शत्रूचे ड्रोन शोधून ते जमिनीवर आणण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

जम्मू, काश्मीर आणि पंजाब येथे पाकिस्तानकडून भारताच्या हद्दीत घुसखोर दहशतवाद्यांसाठी शस्त्र आणि पैशाचा पुरवठा करण्यासाठी आणि अमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. काही महत्त्वाच्या ठिकाणी प्रतिबंधक यंत्रणा बसवण्यात आली आहे. मात्र, विस्तीर्ण सीमाभाग आणि विदेशी प्रतिबंधक यंत्रणेच्या अधिक किमती यामुळे त्यांचा वापर करण्यावर मर्यादा येत आहेत. त्यावर तोडगा म्हणून भारतीय लष्कराने श्वान आणि गरुडांच्या मदतीने पाकिस्तानी ड्रोन जमीनदोस्त करण्याची शक्कल लढवली आहे.

## 'थाई मसाज' हा गंभीर गोष्ट खुसखुशीतपणे सांगण्याचा प्रयत्न: मंगेश हाडवळे




**मुंबई :** थाई मसाज हा चित्रपट माझ्यासाठी खास आहे. त्यात गंभीर गोष्ट खुसखुशीत शैलीत विनोदी ढंगाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्यासाठी जीवापाड मेहेनत घ्यावी लागली आहे. शिवाय हा विषय माझ्या आई, वडिलांशी, त्यांच्यासारख्या अनेक जोडप्यांच्या अनुभवाशी निगडित आहे, असे उद्गार लेखक, दिग्दर्शक मंगेश हाडवळे याने काढले.

माझ्या वडलांना अर्धांगवायूचा झटका आला होता. आई त्यांची सुश्रुषा करायची. मी दूर वसतिगृहात राहत होतो. सुट्टीत घरी यायचो तेव्हा आई बाबांची किती सेवा करते ते बघायचो. त्यांना आंघोळ घालण्यापासून जेवायला घालण्यापर्यंत सगळ्याच गोष्टी ती करायची. बाबा ५१ वर्षांचे होते आणि आई ४१ वर्षांची. आपला पती जिवंत आहे पण त्याच्या आजारपणामुळे त्याच्याकडून अपेक्षित असलेले शारीरिक सुख मिळत नाही. त्यामुळे होणारी कुचंबणा जाणवायची. त्यातूनच थाई मसाजची गोष्ट आकाराला आली, असे मंगेश म्हणाला.

मला गंभीर विषयावरची गोष्ट मांडायची होती. मात्र, ती गंभीर शैलीत मांडायची नव्हती. ते बघायला लोकांना आवडत नाही. म्हणून मला गंभीर विषय विनोदी ढंगाने मांडायचा होता. मात्र, हा विषय विनोदी ढंगाने मांडताना विनोदाची सीमारेषा ओलांडून तो अश्लील होणार नाही, यासाठी खूप काळजी घ्यावी लागली, असे मंगेश सांगतो.

माझे आधीचे पाच चित्रपट लिहिताना फार कष्ट घ्यावे लागले नाहीत. थाई मसाजची पटकथा लिहिताना मात्र खूप मेहनत करावी लागली. एकेक ओळ लिहिताना विचार करावा लागला. या पटकथेचे तब्बल ३६ वेळा पुनर्लेखन करावे लागले. आपल्या वडिलांच्या वयाच्या माणसाची कथा अश्लीलततेकडे झुकू नये यासाठी खूप काळजी घ्यावी लागली. संवाद लिहिल्यानंतर ते आशिष ठाकूर, साजिद अली आणि आणखी दोघांना दाखवले. त्यांच्याशी सल्ला मसलत केली. त्यानंतरच त्याला अंतिम स्वरूप दिले, असे मंगेशने सांगितले.

चित्रपट पाहून बाहेर पडताना एक वेगळा अनुभव प्रेक्षकांच्या गाठीशी मिळावा; त्यांना त्यांच्या पालकांकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन मिळावा, हेच या चित्रपटाचे यश असणार आहे, असेही मंगेशने नमूद केले.

## इन्स्टावर ट्रेंडींग 'प्रसिका'ची यशोगाथा




'प्रसिका' हे इन्स्टा हँडल सध्या आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. प्रत्येक भारतीयाच्या रोजच्या जगण्याशी जोडलेले; बहुतेकांना भावणारे या हँडलवरील कंटेन्ट अनेकांना आवडत आहेत आणि अर्थातच मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. हे इन्स्टा हँडल प्रसाद आणि दीपिका वेदपाठक या अस्सल मराठी जोडप्याने सुरु केले आहे. मराठी दर्शकांबरोबरच जगभरातल्या अन्यभाषिक प्रेक्षकांनाही या हँडलवरील कंटेन्टची भुरळ पडत आहे हे विशेष!

डिजिटल कंटेन्ट तयार करून ते समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्याच्या प्रसादच्या छंदातून या सगळ्याची सुरुवात झाली. त्याचे णी IndianConsumer अर्थात UIC या यू ट्यूब चॅनेलने प्रसादने या उपक्रमाची सुरूवात सन २०१४ मध्ये केली. सर्वसामान्य भारतीय कुटुंबाच्या घरात घडणाऱ्या छोट्या छोट्या गोष्टींची छायाचित्र आणि व्हिडीओज या चॅनेलवर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

कोरोना संसर्गाच्या काळात प्रसाद यांची पत्नी दीपिका हिने या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेतला. मराठीमधील शॉर्ट व्हिडीओज तिने 'टिक टॉक'वर प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. सहा महिन्याच्या कालावधीत त्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. मात्र, नेमकी त्याचा वेळी या चिनी ॲप्लिकेशनवर बंदी घालण्यात आली.

आता मात्र 'प्रसिका' ही एक नाममुद्रा (ब्रँड) बनली आहे आणि तो केवळ इन्स्टाग्रामवरच नव्हे तर फेसबुक, यू ट्यूब अशा बहुतेक सर्वच समाजमाध्यमांच्या प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध होत आहे आणि त्याला प्रेक्षकांकडून उदंड प्रतिसादही मिळत आहे. या उपक्रमासाठी सहा जणांची एक टीम कार्यरत आहे. त्यामध्ये संहितालेखन करणाऱ्यांपासून हिशोब तपासनीसपर्यंत सर्वांचा सहभाग असतो.

फॅन फॉलोईंग प्रचंड आहे. यांना ते UIC Family आणि पंचुसेना असे संबोधतात. त्यांच्या लोकप्रियतेचा फायदा उठवण्यासाठी नामांकित ब्रँड सरसावले

तेव्हा दीपिकाने मंत्रालयातील आपली नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला आणि ती देखील डिजिटल कंटेन्ट तयार करण्याच्या कामात



वर्षभराच्या कालावधीतच प्रेक्षकांनी या कंटेण्टला मोठ्या प्रमाणावर पसंती दर्शवली आहे. समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होताच ते त्वरित व्हायरल होत आहेत.

लंच विथ प्रसिका' या विभाग तर विशेष लोकप्रिय ठरला आहे. विशेषतः यू ट्यूब आणि इन्स्टावरच्या घरगुती खाद्यभ्रमंतीच्या व्हिडीओजना मोठा प्रतिसाद मिळत आहे. या वेदपाठक दांपत्याचे समाजमाध्यमांवरील नसते तरच नवल! आज 'प्रसिका'शी तब्बल १० नामांकित ब्रँड जोडले गेले आहेत. त्यामध्ये नखऊऊ या कपड्यांच्या प्रसिद्ध ब्रँडचाही समावेश आहे. नुकतेच काही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्स 'प्रसिका'शी जोडले गेले आहेत.

सन २०१५ मध्ये विवाहबद्ध झालेले हे जोडपे एकमेकांच्या साथीने प्रगतीची नवी शिखरे संपादन करीत आहे. सन २०१६ मध्ये प्रसादच्या यू ट्यूब चॅनेलने मोठी लोकप्रियता मिळवली पूर्णवेळ सहभागी झाली. लौकीक दृष्टीने सर्वार्थाने यशस्वी ठरलेल्या या जोडप्याने विचारपूर्वक मूल होऊ न देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या ऐवजी १०० अनाथ मुलींची आर्थिक जबाबदारी घेण्याचा त्यांचा निर्धार आहे. सध्या ३ मुलींना दत्तक घेऊन त्यांनी ध्येयपूर्तीकडे वाटचाल सुरू केली आहे. शाळकरी मित्र असलेले आणि पुढे प्रेमाच्या बंधनात एकमेकांशी समरूप झालेले हे जोडपे हे तरुणांसाठी आदर्शवत असेच आहे.

## कायनेटिक लूना पुन्हा अवतरणार इलेक्ट्रिक अवतारात

**पुणे :** कायनेटिकची जुन्या काळातील लोकप्रिय मोपेड लूना ही पुन्हा इलेक्ट्रिक अवतारात अवतरणार आहे. जुन्या मोपेड प्रमाणेच या इलेक्ट्रिकवरील वाहनालाही ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास उत्पादकांना वाटत आहे.

सन १९७२ मध्ये भारतीय बाजारपेठेत पदार्पण केलेली लूना ही त्या काळातील सर्वाधिक लोकप्रिय मोपेड होती. मात्र, बदलत्या काळातील वाढत्या स्पर्धेनुसार कायनेटिक इंजिनिअरिंगने या वाहनाचे उत्पादन तब्बल २८ वर्षानंतर सन २००० मध्ये बंद केले. आता कायनेटिक इंजिनिअरिंगची सहयोगी कंपनी असलेल्या कायनेटिक ग्रीन एनर्जी अँड पॉवर सोल्युशन्सच्या माध्यमातून विजेवर चालणारी लूना पुन्हा बाजारपेठेत येत आहे.

नव्या लूनाच्या उत्पादनासाठी कायनेटिकच्या अहमदनगर येथील उत्पादन प्रकल्पात तीन कोटी रुपयांची गुंतवणूक करून स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात आली आहे. या वाहनाची चासी, अन्य सुट्टे भाग यांचे उत्पादन याच प्रकल्पात करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे, जोडणी आणि रंगकामही याच प्रकल्पात केले जाणार आहे. दरमहा ५ हजार वाहनांचे उत्पादन करण्याची या प्रकल्पाची क्षमता असणार आहे. लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लूनाची दिवसाला दोन हजार वाहने एवढ्या मोठ्या प्रमाणावर विक्री होत असे.

विजेवरील लूनालाही ग्राहकांकडून असाच उत्स्फूर्त प्रतिसाद लाभेल, असा विश्वास कंपनीचे कार्यकारी संचालक अजिंक्य फिरोदिया यांनी व्यक्त केला. गाडी बाजारात आल्यानंतर दोन ते तीन वर्षात याची वार्षिक उलाढाल ३० कोटी रुपये एवढी असेल, असा दावाही त्यांनी केला.



# देशांतर्गत स्थलांतरित मतदारांसाठी दूरस्थ मतप्रणाली राबविण्याची निवडणूक आयोगाची तयारी

**मुंबई :** देशांतर्गत स्थलांतरण करणाऱ्या स्थलांतरित मतदारांसाठी दूरस्थ मतप्रणाली राबविण्याची निवडणूक आयोगामार्फत तयारी करण्यात येत आहे. यामुळे स्थलांतर करणाऱ्या मतदाराने मतदान करण्यासाठी आपल्या गृह राज्यात जाण्याची आवश्यकता राहणार नाही. याबाबतच्या कायदेशीर, परीचालानात्मक, प्रशासकीय व तंत्रज्ञान विषयक आव्हानांबाबत भारतीय निवडणूक आयोगाने संकल्पना दस्तऐवज तयार केला असून सदर दस्तैवजावर आयोगाने राजकीय पक्षांचे अभिप्राय मागविले आहेत. भारत निवडणूक आयोगाचे संयुक्त संचालक (माध्यमे) श्री.अनुज चांडक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

भारत निवडणूक आयोगाने बहु - मतदारसंघीय दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा (RVM²) नमुना विकसित केला आहे. हा दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या प्रात्यक्षिकासाठी राजकीय पक्षांना निमंत्रण देण्यात आले या दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामुळे एकाच दूरस्थ मतदान केंद्रावरून अनेक मतदारसंघातील मतदान हाताळता येणार आहे.

आजच्या तंत्रज्ञानावर आधारित युगात स्थलांतरामुळे मतदान अधिकारापासून वंचित ठेवणे हा पर्याय होऊ शकत नाही. सन २०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सुमारे ६७.४ % इतके मतदान झाले होते. म्हणजेच सुमारे ३० कोटीच्या पेक्षा जास्त मतदार आपला मतदानाचा अधिकार बजावत नाहीत तसेच भिन्न राज्यांमध्ये मतदानाच्या विभिन्न आकडेवारीबाबत भारतीय निवडणूक आयोगाने आपली चिंता वेळोवेळी व्यक्त केली आहे. मतदाराची आपल्या नविन निवासस्थानाच्या जागी मतदार म्हणून नाव नोंदणी न करण्याची बहुविध कारणे असून त्यामुळे तो मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहतो. अंतर्गत स्थलांतरामुळे मतदान करण्यास असमर्थता हे मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि निवडणूकांचे स्वरुप अधिकाधिक प्रतिनिधीक करण्यासाठीच्या प्रयत्नातील एक प्रमुख अडचण असून त्या प्रमुख कारणाचे निराकरण करणे आवश्यक आहे. देशांतर्गत स्थलांतराबाबत कोणत्याही प्रकारचा केंद्रीभूत माहितीसाठा उपलब्ध नसला तरीही नोकरी, शिक्षण किंवा विवाहामुळे होणारे स्थलांतर हा देशांतर्गत स्थलांतराचा प्रमुख घटक असल्याकडे सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध असलेली विविध प्रकारची माहिती अंगुलीनिर्देश करीत आहे. एकूण देशांतर्गत स्थलांतराचा विचार केल्यास ग्रामीण भागातील लोकसंख्येचे बाह्य स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत असून सुमारे ८५ % स्थलांतर हे राज्यांतर्गत होत असल्याचे आढळून येते.

मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर श्री. कुमार हे चामोली जिल्ह्यातील दुमक गावापासून दुरस्थ मतदान केंद्राच्या आपल्या पायी यात्रेमध्ये देशांतर्गत स्थलांतरणाच्या समस्येशी थेट अवगत झाले व त्याप्रती त्यांनी आपले लक्ष स्थलांतरित मतदारांना त्यांच्या निवासस्थानाच्या सध्याच्या ठिकाणावरुन आपला मतदानाचा अधिकार कसा बजावता येईल यावर केंद्रित केले. ही पध्दत राबवित असताना यामध्ये अनेक प्रकारच्या कायदेशीर, परीचालानात्मक , प्रशासकीय व तंत्रज्ञान विषयक अंतरनिरासनांची आवश्यकता लक्षात घेऊन, सर्व आर्थिक - सामाजिक स्तरातील स्थलांतरितांना मतदानामध्ये सुलभतेने सहभागी होता यावे यासाठी द्विमार्गी प्रत्यक्ष डाकेद्वारे मतदान, प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे मतदान, विशेष मतदान केंद्रांमध्ये नियोजित दिनांकाच्या अगोदर स्थलांतरित मतदारांचे मतदान, डाकेद्वारे मतदानाचे एकेरी किंवा दुहेरी पद्धतीने प्रेषण, महाजाल ( इंटरनेट ) आधारित मतदान इत्यादी अशा अनेक पर्यायांचा भारतीय निवडणूक आयोगाने याबाबत नेमलेल्या समितीने सखोल विचार केला.

सर्व हितसंबंधीयांना विश्वासार्ह आणि मान्य होईल असे तंत्रज्ञानावर आधारित उपाय शोधण्याच्या उद्दिष्टाने मुख्य निवडणूक आयुक्त श्री. राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली अन्य निवडणूक आयुक्त श्री. अनुपचंद्र पांडे आणि श्री. अरुण गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक आयोगाने दूरस्थ मतदान केंद्रांवर म्हणजेच देशांतर्गत स्थलांतरीत मतदारांसाठी त्यांची नोंदणी झालेल्या स्वगृही मतदारसंघाच्या बाहेर मतदान केंद्रे स्थापित करून त्यांना दूरस्थ मतदान करणे शक्य होण्यासाठी निवडणूक आयोगाने काळाच्या कसोटीवर उतरलेल्या एम -३ प्रारुपाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या सुधारित आवृत्तीचा उपयोग करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यामुळे आपला मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी मतदारांना त्यांची नोंदणी असलेल्या जिल्ह्यात जाऊन मतदान करण्याची गरज उरणार नाही.

देशांतर्गत स्थलांतरितांची परिभाषा, आदर्श निवडणूक आचारसंहितेचे कार्यान्वयन, मतदानातील गोपनीयतेची खातरजमा, मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदान प्रतिनिधींची व्यवस्था व दूरस्थ पद्धतीने झालेल्या मतदानातील मतांची मोजणी या व अन्य अनुषंगिक विषय व आव्हानांच्या बाबत निवडणूक आयोगाने (https://eci.gov.in/files/file/14714-letter-to-political-parties-on-discussion-on-improving-voter-participation-of-domestic-migrant-using-remote-voting/) या जोडणीवर सर्व राजकीय पक्षांसाठी एक संकल्पना दस्तऐवज प्रेषित केला आहे.

देशांतर्गत स्थलांतरित झालेल्या मतदारांना त्यांच्या दूरस्थ स्थानावरून म्हणजेच शिक्षण / रोजगार इत्यादी प्रयोजनार्थ ते निवास करीत असलेल्या सध्याच्या निवासाच्या स्थानावरून त्यांची नोंदणी झालेल्या मतदारसंघात मतदान करणे त्यांना शक्य होण्यासाठी निवडणूक आयोगाने सार्वजनिक क्षेत्रातील एका नामांकित उपक्रमाच्या सहयोगाने एक बहु - मतदारसंघीय दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यासाठी विकसित केले आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे सुधारित रुप हे एकाच दूरस्थ मतदान केंद्रावरुन ७२ विविध मतदारसंघांना हाताळू शकते. वारंवार बदलावे लागणारे निवासस्थान / निवासाच्या जागा, स्थलांतर झालेल्या स्थानी सामाजिक व भावनात्मक आपलेपणाने जोडलेले नसणे, कायमस्वरूपी पत्ता / निवास / मिळकत असलेल्या मतदारसंघातील मतदार यादीतून नावे वगळण्याच्या बाबतीत असलेली उदासीनता इत्यादी अशा कारणामुळे मतदार नवीन स्थलांतरित झालेल्या मतदारसंघात आपले नाव नोंदविण्यास उत्सुक नसतात. . या उपक्रमाचे कार्यान्वयन झाल्यास स्थलांतरित मतदारांसाठी तो एक महत्वाचा सामाजिक बदल असेल व त्यामुळे ते त्यांच्या मूळ गावांशी / शहरांशी जोडलेले राहतील. बहु -उद्देशीय दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या नमुन्याचे प्रात्याक्षिक दाखविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सर्व मान्यताप्राप्त ८ राष्ट्रीय आणि ५७ राज्य राजकीय पक्षांना १६ जानेवारी २०२३ रोजी निमंत्रित केले आहे. सदर प्रात्यक्षिकाच्या वेळेस तांत्रिक तज्ञांच्या समितीचे सभासद सुद्धा उपस्थित असतील.

त्याचप्रमाणे स्थलांतरित मतदारांना दूरस्थ स्वरूपाच्या मतदान करणे शक्य होण्यासाठी निवडणूक विषयक कायद्यात, प्रशासकीय प्रक्रियेत व मतदानाच्या पद्धतीत / तंत्रज्ञानात करावे लागणारे बदल इ. विविध मुद्यांबाबत भारत निवडणूक आयोगाने मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे लिखित स्वरूपातील अभिप्राय दिनांक ३१ जानेवारी २०२३ पर्यंत सादर करण्याचे आवाहन सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना केले आहे.

विविध हितसंबंधी राजकीय पक्षांकडून प्राप्त झालेले अभिप्राय व नमुना स्वरूपातील बहु - मतदारसंघीय दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक आधारभूत मानून दूरस्थ मतदान पद्धत कार्यान्वित करण्याबाबत निवडणूक आयोग पुढील कार्यवाही करेल,अशी माहितीही श्री. अनुज चांडक यांनी दिली.

## हातावर नाक उगवून त्याचे चेहेऱ्यावर रोपण यशस्वी

**पॅरीस :** विज्ञानाने केलेली अफाट प्रगती आणि त्याचा आंतरशाखीय वापर यामुळे मानवी जीवन अधिकाधिक सुलभ होत चालले आहे. नाक गमावलेल्या एका महिलेच्या हातावर नाक उगवून त्याचे चेहेऱ्यावर करण्यात आलेले रोपण हे त्याचे उदाहरण आहे.

एका मध्यमवयीन महिलेला नाकाच्या पोकळीत कर्करोग झाल्याचे निदान झाले. कर्करोगाचा हा अतिशय जटील प्रकार आहे. या कर्करोगामुळे नाकाशी संबंधित बहुतेक सर्व शारीरिक क्रिया ठप्प होतात. या महिलेला शस्त्रक्रियेनंतर देण्यात आलेल्या रेडिओ थेरेपी आणि किमो थेरेपीमुळे तिला नाक गमावण्याची पाळी आली.


abhimukhi foundation

" Equity Is True Religion"

Founded in the year 2014 by two siblings having vast experience in Social Development & Media, focusing on Education, Health, Skill Development, Disability for the underprivileged having less opportunities

DONATE
INDIAN BANK
ACCOUNT NO. 6303369914
IFSC : IDIB000W014

follow us / abhimukhifoundation

www.abhimukhifoundation.org

Chavan Eco-Village, Row House No. 18, Kasba, Baramati, District Pune 413102 Maharahtra INDIA
email: abhimukhifoundation@gmail.com





श्री निलेश गोवर्धन बनसोडे
मोटार वाहन निरीक्षक
यांना
आदर्श आरटीओ अधिकारी पुरस्कार मिळाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये आपल्या उल्लेखनीय केलेल्या सेवेबद्दल तसेच केलेल्या सामाजिक कार्याबद्दल **अखिल भारतीय पत्रकार कल्याण संघातर्फे** **मा. निलेश गोवर्धन बनसोडे** यांना आदर्श आरटीओ अधिकारी पुरस्कार जाहीर करण्यात आला त्याबद्दल त्यांचे
अभिनंदन... अभिनंदन... अभिनंदन...





श्री विनोद मुरलीधर पवार
सामाजिक कार्यकर्ता
यांना
समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
सामाजिक कार्यकर्ते तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे शहर सरचिटणीस **विनोद मुरलीधर पवार** यांनी पुणे शहरांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल **अखिल भारतीय पत्रकार कल्याण संघातर्फे** त्यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला त्याबद्दल त्यांचे
अभिनंदन... अभिनंदन... अभिनंदन...